# गगन दुंदुभी वाजे*

मूळ हिंदी संहिताः पीयूष मिश्रा

मराठी भाषांतरः साहिल कल्लोळी

* हाकारा । hākārā या मराठी व इंग्रजीत प्रकाशित होणाऱ्या ऑनलाईन नियतकालिकाच्या दहाव्या आवृत्तीमध्ये 'गगन दमामा बाज्यो' या हिंदी नाटकाचे मराठी भाषांतर प्रकाशित झाले आहे . मराठी नाटकाच्या सादरीकरणासाठी भाषांतरकाराची परवानगी आवश्यक. परवानगीसाठी साहिल कल्लोळी यांच्याशी sahilkalloli@gmail.com या ईमेलद्वारे संपर्क साधावा.

## अंक पहिला

**(दृश्य १)**

[नाटक सुरु होतं. मंचाच्या एका भागात गायक तर दुसऱ्या भागात गायिका; दोघांवर प्रकाश. गाणे सुरु.]

दीप जिस का महल्लात ही में जले
चंद लोगों की ख़ुशियों को ले कर चले
वो जो साए में हर मस्लहत के पले
ऐसे दस्तूर को सुब्ह-ए-बे-नूर को
मैं नहीं मानता मैं नहीं जानता

फूल शाख़ों पे खिलने लगे तुम कहो
जाम रिंदों को मिलने लगे तुम कहो
चाक सीनों के सिलने लगे तुम कहो
इस खुले झूट को ज़ेहन की लूट को
मैं नहीं मानता मैं नहीं जानता

तुम ने लूटा है सदियों हमारा सुकूँ
अब न हम पर चलेगा तुम्हारा फ़ुसूँ
चारागर दर्दमंदों के बनते हो क्यूँ
तुम नहीं चारागर कोई माने मगर
मैं नहीं मानता मैं नहीं जानता[1]

[हळूहळू गाणे संपते. ज्या भागात हे कलाकार उभे आहेत तिथे प्रकाश मंदावत जातो ; त्याचबरोबर रंगमंचावरील दुसरा भाग उजळतो. साल १९६५, सफदरजंग हॉस्पिटल, दिल्ली. एका म्हाताऱ्याच्या खाटेसमोर एक माणूस उभा आहे.]

1 हबीब जालिब

म्हातारा : (माणसाकडे काळजीपूर्वक बघत) मी ओळखलं नाही.

माणूस : जरा नीट बघा.

म्हातारा : (थोडावेळ बघतो, दमलेल्या आवाजात) आठवत नाही काही.

माणूस : खरंतर गोष्टी आता जुन्या झाल्या, गोष्टींसोबत तो काळही मागे पडला, काळाच्या ओघात इतिहास आणि इतिहासासोबत माणसं देखील जुनी झालीत.

म्हातारा : माणसं कधी जुनी होत नाहीत. कारण माणसं इतिहासाचे किंवा तारखांचे गुलाम नसतात.
लोक पुस्तकात छापलेल्या ओळींमधून इतिहास समजून घेतात. पण माणसांची ओळख पटवण्यासाठी आठवणींच्या दारावरची एक हलकीशी थापदेखील पुरेशी असते.

माणूस : तर मग द्या आठवणींच्या दारावर एखादी हलकीशी थाप; बघा काही आठवतंय का?

म्हातारा : (निरखून बघत) माफ करा, एकतर मला नीटसं आठवत नाही आणि दुसरं म्हणजे की आता जोर लावून आठवू शकेन इतकी ताकदही शरीरात उरलेली नाही; त्रास होतो आताशा.

माणूस : त्रासाची काळजी तुम्ही कधीपासून करू लागलात?

म्हातारा : (त्याच्याकडे निरखून बघत) काळजी करणे हा माणसाचा स्वभाव आहे. आपल्याला होणारा त्रास किती आणि किती नाही याची काळजी मेल्यानंतर करता येत नाही. त्यासाठी जिवंत राहणं गरजेचं असतं. फैज अहमद फैजचा तो शेर वाचला आहेस का?

माणूस : कोणता?

म्हातारा : और जब याद की बुझती हुई शम्मों में नज़र आया कहीं
एक पल आख़िरी लम्हा तिरी दिलदारी का
दर्द इतना था कि उस से भी गुज़रना चाहा
हम ने चाहा भी मगर दिल न ठहरना चाहा

माणूस : मलाही एक शेर आठवतो आहे.

म्हातारा : कोणता?

माणूस : वतन की आबरू का पास देखें कौन करता है
सुना है आज मक़तल में हमारा इम्तिहाँ होगा
इलाही वो भी दिन होगा जब अपना राज देखेंगे
जब अपनी ही जमी होगी और अपना आसमाँ होगा[2]

म्हातारा : (बारकाईने बघत) कोण आहेस तू?

माणूस : काय क्रांतिकारी शेर आहे ना?

म्हातारा : मी विचारलं, तू कोण आहेस?

माणूस : आज १९६५ सुरु आहे. दिल्लीतल्या सफदरजंग हॉस्पिटलच्या या इमारतीमध्ये बसून मला आठवतंय की हा शेर चाळीस वर्षांपूर्वी जप्त करण्यात आला होता , लाहोरमध्ये.

म्हातारा : तू लाहोरमध्ये होतास?

माणूस : मी कानपूरमध्ये होतो, मी आग्र्यामध्ये होतो, मी पाटण्यामध्ये होतो, मी कलकत्त्यामध्ये होतो, मी दिल्लीमध्ये होतो आणि मी लाहोरमध्ये देखील होतो.

म्हातारा : (त्याला निरखून बघत) कधीची बाब आहे ही?

माणूस : १३ एप्रिल १९१९. ज्या दिवशी हिंदुस्थानच्या इतिहासातील सर्वात रक्तरंजित बैसाखी (संक्रांत) साजरी झाली. ज्या दिवशी लहानी पोरं जिवाच्या आकांतानं किंचाळली, ज्या दिवशी बापांचं काळीज पिळवटून निघालं आणि ज्या दिवशी लाहोरमधील लायलपूर जिल्ह्यातल्या बंगा गावातील एक आई आपलं उद्ध्वस्त झालेलं पीक वैफल्याने बघत म्हणाली होती..

[म्हाताऱ्यावरील प्रकाश मंदावतो. संगीतासोबत मंचाच्या मध्यावर प्रकाश उजळतो, त्यामध्ये उभ्या असणाऱ्या स्त्रीचा कापणारा आवाज ऐकू येत आहे]

स्त्री : पिकाला तोंड लावलं तर पोटच्या गोळ्यांचं मांस खाईन मी..हे माझे धरणीमाय.. तू या पिकांना जन्म दिलास आमच्यासाठी, आमच्या पोरांसाठी. आम्ही आमच्या आयुष्याचं खतपाणी करून ते सांभाळलं, जगवलं. यामध्ये आहेत आमच्या पोरांचे श्वास, त्यांचं आयुष्यदेखील. आज त्या श्वासांनी एकत्र येऊन सारे आसमंत दुमदुमवले असते, ही जमीन हादरवली असती, इथले नदी नाले भरभरून ओसंडवले असते. जर या श्वासांना जिंवत राहण्याची संधी मिळाली असती तर. आज या बैसाखीच्या संध्याकाळी माझ्यासोबत हिंदुस्थानातील लाखो-करोडो आया आपल्या लालबुंद नजरा वाहेगुरूंच्या अमृतसरकडे लावून बसल्या असतील, जिथे कापलं गेलंय आमचं पीक, जिथे उध्वस्त झालंय आमचं शेत, आमचं आयुष्य. जिथे उजाड झाली आमची बैसाखी त्या जालियनवाला बागेमध्ये. जिथली माती आज सकाळी या देशातील लहान मुलांच्या रक्ताने माखून लाल झाली. ओ गांधी.. आमचे महात्मा, आता आमच्या उरल्यासुरल्या पोरांना सोपवतो तुमच्याकडे.. फेकतोय ते इवलेसे जीव आम्ही तुमच्याच झोळीत. घेऊन जा यांना तुमच्यासोबत आणि सांगा त्या दूरवरून आलेल्या व्यापाऱ्यांना, की यानंतर पंजाबमधल्या प्रत्येक बैसाखीचा रंगच न्यारा असणार आहे.

(अंधार)

**(दृश्य २ अ)**

[समोरासमोर दोघे उभे आहेत, दोघांवर प्रकाश]

सुखदेवः १९२३ साली या जळणाऱ्या हिदुस्थानात लाहोर नॅशनल कॉलेजमध्ये काय करायला आला आहेस?

भगतः तेच, जे करायला आपण आला आहात. शिकायला!

सुखदेवः तोंड फारच चालतंय तुझं. मी सिनिअर आहे तुझा. चल, रॅगिंगला तयार हो.

भगतः जशी आज्ञा.

सुखदेवः मंगल पांडेच्या बापाचं नाव सांग.

भगतः (हसतो) माहीत नाही.

सुखदेवः माननीय मदन मोहन मालवीयजींचं पूर्ण नाव सांग.

भगतः (पुन्हा हसतो) ते पण नाही माहीत.

सुखदेवः हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामाने आजवर पाहिलेला सर्वात घाणेरडा माणूस कोण?

भगतः जनरल ओ डायर.

सुखदेवः (त्याला रोखून पाहतो) आणि सर्वात महान माणूस?

भगतः (काहीतरी पुटपुटतो आणि शांत बसतो).. अजून कोणी नाही.

सुखदेवः तू काहीतरी बोलणार होतास.

भगत : मी गांधीजी म्हणणार होतो.

सुखदेव : (रोखून बघतो, हसतो) माणसा, तू आवडला आहेस आपल्याला, खूप जमणार आपलं. (हात पुढे करतो) माझं नाव सुखदेव. सुखदेव थापर.

भगत : (हसून हात मिळवतो) माझं नाव भगत सिंह. भगत सिंह सन्धू.

**(दृश्य २ ब)**

[मंचावरचं पूर्ण प्रकाश, दृश्य बदलेलं, १९२४ लाहोर नॅशनल कॉलेजच कँटीन, विद्यार्थी जमलेत, तणाव दिसतो आहे, हाताच्या मुठी आवळून दोघे तिघे विद्यार्थी फेऱ्या मारता आहेत , बाकीचे बसलेत.]

भगत : ही कधीची गोष्ट आहे?

जयदेव : काल संध्याकाळची.

भगत : किती जण होते?

भगवती भाई : तो एकटाच होता पण समोरून चार-पाच जण.

भगत : फार लागलंय का?

यशपाल : (मानेनं होकार देत) हो, लागलं आहे तर.

भगवती : आज सकाळी डॉक्टरकडे चल म्हटलं तर चिडला, माझ्याशी भांडायला लागला. म्हणत होता , प्रायव्हेटमध्ये जायला माझ्याकडे पैसे नाहीत पण काहीही झालं तरी मी सरकारी हॉस्पिटलमध्ये जाणार नाही.

भगत : काय मूर्खपणा आहे? असहकार आंदोलन बंद होऊन आता वर्ष व्हायला आलं. आता सरकारी हॉस्पिटलमध्ये जायला काय हरकत आहे ? साल्यांनो, आंधळे होऊन लढणार आहात काय? आणि तुम्ही सगळे कुठं होता?

यशपाल : आमचंपण जायचं ठरलं होतं. सकाळपासून तुलाच शोधत होतो, तू सापडला नाहीस. त्यात लालाजींनी संध्याकाळी अचानक मिटिंग बोलावली तिकडे जावं लागलं. परवा बड्या चौकात व्हॉइसरॉयचा पुतळा जाळायचा आहे , नंतर मोर्चापण आहे. आता या सगळ्यात आमचं जायचं राहिलं. रात्री कळलं आम्हाला हे इतकं मोठं कांड झाल्याचं. पण तू कुठं गेला होतास?

भगत : बेबेची (आईची) तब्येत खराब झाली, अचानक जावं लागलं मला . काल परतीची गाडी नाही मिळाली , म्हणून मग आज सकाळी आलो. पण मी काय म्हणतो, तुम्ही लोकांनी त्यांची माहिती तरी काढली का ? साल्यांना नंतर बघून घेतला असता.

मार्कंड त्रिवेदी : (हळू आवाजात) कळलंय आम्हाला कोण आहेत ते. ऑफिसर्स लेनमधल्या साहेबांची पोरं होती. पण आता तर इच्छा असूनदेखील काही करता येणार नाही.

भगत : का?

मार्कंड : त्यांनीच याच्याविरुद्ध एफआयआर केली आहे आणि आता काही केलं , तर हे भांडण वाढणार.

सुखदेव : अरे, आता जे झालंय त्यापेक्षा अजून काय वाढणार? आणि वाढलं तर वाढूदे; बघून घेऊ. पण हा मुईन आहे तरी कोठे? भगवती भाई, तुम्हाला भेटला होता का?

भगवती : भेटला. पण प्रश्न विचारायला लागल्यावर काहीतरी कारण देऊन लगेच पळाला.

आता तर..

(मुईन प्रवेश करतो, त्याच्या येण्याने सगळे उठतात , तो आत येतो, डोक्यावर पट्टी बांधली आहे, काहीजण त्याला खुर्चीवर बसवतात, एकजण पाणी घेऊन येतो, मुईन एका झटक्यात ते समोरून बाजूला करतो.)

भगत : (त्याच्या जवळ जातो, गंभीर आवाजात) मुईन मी तुला जास्त काही विचारणार नाही. फक्त एका प्रश्नाचं उत्तर दे. त्यांची नावं काय? (मुईन तसाच एका बाजूला बघत बसून आहे, भगत त्याची कॉलर पकडतो आणि त्याला झटक्याने उभा करतो) नावं....?

मुईन : जिम क्रेन, स्टीफन क्रेन. बाकी दोघांना मी ओळखत नाही.

भगत : (त्याच्याकडे निरखून बघत) ही ऑफिसर डेव्हिड क्रेनचीच पोरं ना?

मुईन : हो.

भगत : (त्याला सोडतो ) ठीक. सुख, एफआयआरमध्ये बाकीच्या दोघांची नावं असतीलच, यांच्यासाठी तिघेजण बास आहेत, हॉकी स्टिक्स मिळाल्या तर घे नाहीतर तर नुसते हात आणि पाय . रात्री क्लबमधून दारू पिऊन येताना पिंपळाच्या पारापाशी यांना हाणायचा.

सुखदेव : (मान हलवून) ठीक आहे.

भगत : आणि एक लक्षात ठेव यांच्या गाडीची एकही काच राहिली नाही पाहिजे, माजलेत साले.

सुखदेव : आलं लक्षात.

मार्कंड : अरे पण, काय झालंय ते पूर्ण ऐकून तरी घ्या, कदाचित याचीही चूक असेल?

मुईन : (ताडकन उभा राहतो) माझी चूक? माझी चूक? खैरुला वाचवला ही माझी चूक?
त्याच्या बायकोला आणि बहिणीला वाचवलं ही माझी चूक ? साऽला इथे बसून भंकस करतोय. तिकडे सगळ्यांसमोर यायला काय फाटली होती का तुझी?

मार्कंड : अरे, माझ्यावर का चढतोयस? सगळ्या गोष्टींचा विचार तर केला पाहिजे ना ? का ते गोरे आहेत म्हणून चूक नेहमी त्यांचीच असणार?

सुखदेव : (चिडून) होय, त्यांचीच असणार.

मार्कंड : आता हे असलं काहीही बोलू शकतो आपण, भगवती भाई.

भगवती : (मार्कंडला उद्देशून) हे आम्ही नाही बोलत, काळच सांगतोय. (मुईनला उद्देशून) मुईन, नेमकं काय झालं होतं?

मुईन : यशपाल म्हणाला जगमग टॉकीजला जाऊ फिल्म बघायला , संध्याकाळच्या शोची तिकीटं काढून ठेव . मी तिकीटं काढून या सगळ्यांची वाट बघत टॉकीजबाहेर उभा होतो. अचानक आतून मोठा दंगा ऐकू येऊ लागला. कसला आवाज येतोय हे बघायला पळत आत गेलो अन् पाहिलं ते चौघे खैरूला जमिनीवर पाडून लाथाबुक्क्या मारत होते. शेजारीच त्याची बायको बाळाला घेऊन उभी होती आणि बाळ खूप जोरजोराने रडत होतं.

भगत : हा खैरू म्हणजे आपला टांगेवाला खैरूच ना?

मुईन : हो, तोच. मारता मारता इंग्लिशमधून शिव्याशाप देत होते, म्हणत होते की , 'आमच्याशी सहकार करणार नाही म्हणे, नॉन-कोऑपरेशन मुव्हमेंट करतायत, काळे कुत्रे? तुमच्या त्या बापाला, गांधीला घ्यायला लागली ना मुव्हमेंट मागे ? आमच्याशी बरोबरी करायचा प्रयत्न करता आहेत 'डॅम ब्लॅकी' आणि त्यानंतर .. (मुईनला दम लागतो.)

भगत : त्यानंतर काय?

मुईन : त्यानंतर त्या साल्या लंबूने खैरुवर आपलं कुत्र सोडलं. खैरुचा अक्खा हात त्या कुत्र्यानं फाडून काढला. खैरू तसाच विव्हळत झटपटत होता. पण मग त्यांच्यातला एकजण त्याच्या बहिणीकडे वळला. तो शिवीगाळ करत पुढे जायला लागल्यावर मला सहन झालं नाही , मी सरळ त्याच्या समोर जाऊन उभा राहिलो. या खैरुने आपल्याला कितीतरी वेळा टांग्यातून सोडलं आहे यार . मी मध्ये पडलो आणि त्यांनी खैरु सोडून माझ्याकडे मोर्चा वळवला , मला खाली पडून नाकातोंडावर लाथा घातल्या, मी एकटा पडलो तिकडे. यांच्यातलं कोणीही तिकडे पोहोचलं नव्हतं. मग पोलीस आले आणि उलट माझ्यावरच एफआयआर केली. नंतर अब्बा आले तेव्हा कुठं मला सोडलं.

सुखदेव : पण झालं काय होतं?

मुईन : अंधारात खैरू चुकून ए क्लास मध्ये शिरला, झालं इतकंच.

(शांतता)

सुखदेव : बोल आता, आयसीएसची अवलाद, कोणाची चूक होती?

मार्कंड : (चाचपत) हं, याचं म्हणणं मान्य करायचं झालं तर चूक त्यांची वाटत आहे.

सुखदेव : आजकाल चुकांचे हिशोब बरोबर जमायला लागलेत. बास झालं तुझं हे. (मुईनला उद्देशून) मुकाट्याने पाणी पी. आता जे व्हायचं आहे ते होईल . तोंड वाकडं करायची काही गरज नाही . (त्याच्या पाठीवर हात फिरवतो, भगत शांतपणे बाहेर बघतो आहे. वातावरण थोडंसं निवळत आहे.)

सुखदेव : (मोठ्याने) अरे... या सगळ्या नादात फिल्म राहिलीच. बोला जायचं का आज?

(सगळे जायचं म्हणून ओरडतात.)

मार्कंड : पण कोणती फिल्म?

सुखदेव : काळजी नको, चॅप्लिन किंवा गार्बोची नाही आहे. तुझी ‘राजा हरिश्चंद्र’ आहे.

मार्कंड : झालीच पाहिजे यार, इंडियन मायथॉलॉजीवर अजून फिल्म आल्या पाहिजेत.

सुखदेव : तर तर.. इंडियन मायथॉलॉजी म्हणे. बेट्या, तुझ्या देवांनी प्यायलेलं बरं चालतं रे तुम्हाला? तुझ्या देवांनी प्यायलं तर सोमरस आणि आम्ही प्यायलं तर व्हिस्की. (सगळे हसतात)

भगवती : (हसत हसत) तो लालाजींकडे तक्रार करेल हं.

सुखदेव : (उपहासाने) तर तर.. लाला लाजपतराय, महान स्वातंत्र्य सेनानी. बाकी भगवतीभाई, या आंदोलनानंतर लालाजी थोडे बदलल्यासारखे वाटले नाहीत का?

भगवती : (हसून) मग काय तर, आता फक्त कॉलेजच्या बोर्डवर एक नोटीस लागायची राहिली आहे, “१९२४ मधील या पवित्र स्वातंत्र्य संग्रामामध्ये ही गोष्ट कदापिही विसरू नका की तुम्ही एक हिंदू आहात.“ (सगळे हसतात.)

सुखदेव : अरे, ते यलो पॅम्फ्लेट कॉन्स्टिट्यूशन वाचलंय का कुणी?

मार्कंड : यलो पॅम्फ्लेट कॉन्स्टिट्यूशन? हे काय आहे?

भगवती : अरे, सन्याल बाबूनी जुन्या क्रांतिकारकांची मोट बांधून एक नवीन असोसिएशन तयार केली आहे. एच. आर. ए. म्हणजेच हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशन. ‘स्वतंत्र भारत’ हे त्यांचं टारगेट आहे. या एचआरएच्या कॉन्स्टिट्यूशनला यलो पॅम्प्लेट म्हणजेच “द रिव्होल्यूशनरी” हे नाव पडलंय.

मार्कंड : व्हेरी गुड, स्वातंत्र्य अजून मिळालं नाही आणि कॉन्स्टिट्यूशन छापून तयार?

सुखदेव : का नाही होऊ शकत? आता लग्न ठरलं नसलं म्हणून काय झालं, घरी मुंडावळ्या ठेवल्या तर कुठं बिघडलं? (सगळे हसतात)

मार्कंड : यार, मला या ऑर्गनायझेशन्समध्ये काहीच अर्थ वाटत नाही . कधी होमरूल, कधी गदर पार्टी आणि आता हे एचआरए. काय होणार आहे यानं?

भगत : तर मग कशानं काय होणार आहे?

मार्कंड : यार भगत, तू मान अथवा न मान, काँग्रेस गेल्या तीस वर्षांपासून टिकून तर आहे ना?

भगत : टिकून आहे कारण तिला फक्त तेवढंच करायचं आहे, टिकून राहणे.

मार्कंड : असं काही नाही, तिला काम पण करायचं आहे. तेवढी असहकार आंदोलनाची गोष्ट सोडून दे.

सुखदेव : का? का? असहकार आंदोलनाविषयीच बोलूयात ना.

मार्कंड : तिथे थोडी अडचण आहे.

सुखदेव : तुला एकट्यालाच अडचण का असावी? नुकसान तर इथे असलेल्या सगळ्यांचं झालं. प्रत्येकाला काहीना काही तरी गमवावं लागलंच होतं.

मार्कंड : काहीतरी मिळवण्यासाठी काहीतरी गमवावं लागेलच ना.

भगवती : काय मिळवलं? काय मिळवलं?

मार्कंड : ठीक, काही नाही, पण याचा दोष जनतेकडेच जातो.

भगवती : दोष? जनतेचा? तो कसा काय बुवा?

मार्कंड : भाई, लक्षात घ्या. त्या आंदोलनाच्या काही अटी होत्या ज्या पाळल्या गेल्या नाहीत. म्हणून मग त्या माणसाने हे आंदोलन मागे घेतलं.

भगवती : चौरीचौराच्या पोलिसांनी निशस्त्र जमावावर गोळ्या चालवल्या , पंचवीस एक माणसं मेली, म्हणून चिडलेल्या जमावानं चौकीला आग लावली ; त्यात काही पोलीस जळून मेले. या सर्वाचा दोष लोकांवर ठेवून आंदोलन मागे घेतलं.

मार्कंड : मग चौकीला आग लावायची काय गरज होती?

सुखदेव : मग काय करायचं होतं? चौकीच्या उंबऱ्यावर डोकं टेकवून यायचं होतं? कुठली काँग्रेसी पुस्तकं वाचून आला आहेस, मार्कंड त्रिवेदी?

मार्कंड : उगा माझ्यावर काहीही आळ घ्यायचं कारण नाही . तुम्हा सगळ्यांसोबत मी देखील उतरलो होतो आंदोलनात.

सुखदेव : बाप आयसीएस, पोराकडं करायला काही नाही . मग आता काय? चला, एक ॲडव्हेंचर करू.

मार्कंड : तोंड सांभाळून बोल सुखदेव, प्रत्येकाला त्याचं स्वतंत्र मत असण्याचा अधिकार आहे. मी आजदेखील हेच म्हणेन, की या गांधी नावाच्या माणसामध्ये काहीतरी आहे नक्कीच.

भगत : (शांतपणे) नक्कीच, नक्कीच काहीतरी आहे, देशातली बारा-तेरा वर्षाची लहान लहान पोरं ज्या माणसासाठी इतक्या कोवळ्या वयात रस्त्यावर येतात त्या माणसामध्ये नक्कीच काहीतरी असणार . काय जोश होता पोरांचा. आंदोलन करायचंय, बस्स. गांधीजी म्हणाले या गोऱ्यांचं शिक्षण नकोय आपल्याला, सोडा

त्या शाळा. दप्तर नाल्यात फेकून पोरं तयार, वह्या पुस्तकं पेटवून पोरं तयार, आपल्या छोट्या छोट्या हातांनी पत्रकं वाटली होती, घोषणांच्या पाट्या उचलल्या होत्या आणि अचानक एका सकाळी कळतं, की आंदोलन मागं घेतलंय. आणि त्यानंतर, आठवतंय काही? पोरांसाठी सरकारी शाळा बंद, सरकारी कॉलेजमध्ये कोणी दाखला देईना, जायचं कुठं? करायचं काय? कोणाकडं करायची तक्रार? न कोणी ऐकायला होतं न कोणी काही सांगायला. पोरं सताड डोळ्यांनी आभाळ फाडत बसली होती. आठवतो तुला तो दिवस?

मार्कंड : (अडखळत) हो हो, आठवतो तर, पण इतका काही त्रास झाला नव्हता.

सुखदेव : त्रास झाला नव्हता? साल्या, अनारकली हॉटेलवर कुत्र्यासारखा रडत आला होतास. मी काय करू आता? माझं शिक्षण कसं होणार? बाप जीव घेईल माझा..

मार्कंड : तोंड सांभाळ सुखदेव!

सुखदेव : साल्या, फाटली होती तुझी. इथले किमान पंधराजण तरी असतील तिथे त्या दिवशी. नशीब समज लालाजींनी आपल्यासारख्यांसाठी हे नॅशनल कॉलेज खुलं केलं. नाहीतर भीक मागत फिरला असतास.

मार्कंड : (चिडून) भीक मागितली असते म्हणे, अरे चल! दहा वीस लोकांना मीच ठेवेल नोकरीवर, माझ्या घरी. हवी आहे का कोणाला?

सुखदेव : साल्या, तू नोकरी देणार आम्हाला? आयसीएसची औलाद? ऍडव्हेंचर म्हणून क्रांती करणार? वर दुसऱ्यांच्या भावनांची खिल्ली उडवणार? तुला चौरीचौरामध्ये मेलेले पोलीस आठवले, पण त्यांचं काय जे पोलिसांच्या गोळ्या खाऊन मेले? पाच वर्षांपूर्वीचं जालियनवाला हत्याकांड तू विसरलास? त्या मेलेल्या पंधराशे लोकांमध्ये तुझी आईबाप, भाऊबहीण कुणीच नव्हतं म्हणा, तू कशाला लक्षात ठेवशील?

मार्कंड : धिस इज टू मच, भगवती भाई.

भगत : नथिंग इज टू मच. नथिंग इज टू मच. पण मला तुम्हाला एकच प्रश्न विचारायचा आहे मिस्टर गांधी, देशातल्या मुलांसमोर दुसरा कोणता पर्याय ठेवला तुम्ही?

(अंधार)

**(दृश्य ३)**

[कॉलेज कँटीनचा परिसर]

किशन सिंह : कुठाय तो?

भगवती : जी, कोण?

किशन सिंह : (काठी उचलून) सांगू का कोण?

भगवती : अच्छा तो, तो इथे तर नाही.

किशन सिंह : ते दिसतंय मला. आहे कुठं तो?

भगवती : दोन दिवस झाले तो इकडे फिरकलेलाच नाही.

किशन सिंह : गोऱ्यांनी खाल्ला का लाहोरनं गिळला. सगळ्या घरात सण साजरा होतोय आणि हा हरामखोर आपल्या आई बापाला सणासुदीचं वाट बघायला लावून कुठं उंडारायला गेलाय कोणास ठाऊक? येऊदेत तर माझ्या तावडीत बघून घेतो त्याला. (थांबून) आणि तू रे, मी जे सांगितलं होतं ते त्याला समजावलंस का?

भगवती : हो तर, समजावलं मी त्याला. त्याला समजलं पण.

किशन सिंह : मग?

भगवती : मुलगी थोडी शिकलेली असती तर... म्हणजे असं तो म्हणत होता.

किशन सिंह : (ओरडून) शिकलेल्या मुलीचा फोटो फ्रेम करून लावायचा आहे का घरी ? साल्यांनो, तुम्हा सगळ्यांना या नॅशनल कॉलेजनं बिघडवलंय. तुम्ही आणि तुमचे गुरु, मला सांगा लालाजींनी लग्न केलं नाही का ? तो विद्यालंकार अजून कारा फिरतोय का? अजून काही दिवसांनी लाहोरच्या गल्ल्यांमधून पोरींचे परकर हुंगताना सापडाल. (सगळे गुपचुप उभे आहेत). ठीक आहे, सरदाराचं पोरगं दांडक्याची भाषाच समजणार. त्याला तर मी बघून घेईन. हे सुखदेव आणि यशपाल कुठे राहतात?

भगवती : सुख तर जयगोपालसोबत कन्हैय्यालाल बिल्डींगमध्ये राहतो आणि यशपालचं काही माहीत नाही.

किशन सिंह : (काठी उचलून) साल्यानो, बास झाली तुमची नाटकं, नाही तुमच्या गांडीवर दंडुके मार-मारून क्रांती बाहेर काढली तर मी पण सरदार अर्जुन सिंहाचा पोरगा सरदार किशन सिंह नाही. (झटक्यात निघून जातो.)

(अंधार)

**(दृश्य ४)**

[भगवती भाईंचे घर, लाहोर. भगवती भाई एका टेबलवर बसून काहीतरी लिहीत आहेत.]

दुर्गा भाभी : भाई संध्याकाळ होत आली, अजून कसे आले नाहीत लोक?

भगवती : येतील ते दुर्गा, ही मंडळी तशी वेळ पाळणारी आहेत.

दुर्गा भाभी : (चेष्टेच्या स्वरात) आज कोणता गंभीर विषय आहे तुमच्या चर्चा मंडळाचा?

(सगळे काहीतरी बोलत आत येतात, येताना सुखदेव बोलत आहे)

सुखदेव : म्हणजे विद्यार्थ्यांनी राजकीय कामात भाग घेऊ नये असंच ना?

यशपाल : अरे, पण त्यांचं म्हणणं असं आहे, की विद्यार्थ्यांचं मुख्य काम हे शिक्षण घेणं आहे.

भगवती : हे घे, आता हाच आजचा विषय समज. (दोघे हसतात)

(सगळे एकमेकांना भेटतात, घरी बैठक जमवतात.)

दुर्गा भाभी : अच्छा, तर परवाच्या सरकारी पत्रकाविषयी बोलता आहात का?

यशपाल : हो ना दुर्गाभाभी , शिक्षणमंत्र्याने नवीन नियम केलाय, 'शिकवणाऱ्या अथवा शिकणाऱ्यांपैकी कोणीही राजकीय कामात भाग घेऊन नये' . निव्वळ बालिशपणा दुसरं काही नाही.

सुखदेव : भाभी, तुम्हाला मागच्या आठवड्यातली गोष्ट सांगतो . लाहोरमध्ये स्टुडंट युनियनने 'विद्यार्थी सप्ताह' आयोजित केला होता . तर या राजकीय कृतीमध्ये विद्यार्थ्यांनी भाग घेऊ नये हे सांगण्यात आमचे गुरुजन , सर अब्दुल कादर आणि प्रोफेसर ईश्वरचंद्र सर्वात पुढे होते. आता याला काय समजायचं आम्ही?

दुर्गा भाभी : राजकीय निरक्षर. एकवेळ निरक्षर परवडतील पण हे असले राजकीय निरक्षर जास्त घातक. आजवर इतकी बलिदानं देऊन देखील पंजाबला पॉलिटिकली बॅकवर्ड समजले जातं ते काही उगीच नाही . जोपर्यंत आजूबाजूच्या घटनांचे राजकीय, सामाजिक अर्थ आपण समजावून घेत त्यांना आपल्या कामामध्ये उतरवत नाही, तोपर्यंत आपण खऱ्या अर्थाने पुढे जाऊच शकणार नाही.

भगवती : याला जबाबदार आपली शिक्षण व्यवस्थादेखील आहे . हे असं ठोकळेबाज घोकंपट्टीचं 'शिक्षण' घेणाऱ्या पिढीला देशाच्या राजकीय जडणघडणीत काहीच योगदान देता येत नाही.

भगत : विद्यार्थ्यांचं मुख्य काम शिक्षण घेणे आहे , हे मला मान्य आहे आणि त्यांनी त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित करावे. पण देशाची आपली आताची परीस्थिती काय आहे, त्यासमोरचे महत्त्वाचे प्रश्न काय आहेत आणि मुख्य म्हणजे ते प्रश्न सोडवण्याचे उपाय काय आहेत यांचा विचार आजच्या शिक्षणात का असू नये? आणि जर असं नसेल, तर जे शिक्षण फक्त कारकून बनवण्यासाठी दिलं जाते, त्या शिक्षणाला मी निरुपयोगी मानतो.

सुखदेव : पण काही महाचतुर लोक असे म्हणतात, 'बाळा, तू राजकारण नक्की समजावून घे हं, पण तितकंच पुरे. प्रत्यक्ष कोणत्याही प्रकारे सहभाग घेऊ नकोस.'

दुर्गा भाभी : हे मत ऐकायला छान वाटू शकतं , पण ते तसं नाहीय. इंग्लंडच्या विद्यार्थ्यांनी आपापली कॉलेजं सोडून जर्मनी विरुद्धच्या लढाईमध्ये भाग घेतला. याला काय म्हणाल तुम्ही? 'वेडी पोरं'? आज बार्डोली सत्याग्रहात अहमदाबाद नॅशनल कॉलेजचे अनेक विद्यार्थी आहेत. त्यांना काय म्हणाल तुम्ही? 'वाट चुकलेले'? जगाच्या क्रांत्यांचे इतिहास वाचले तर आपल्याला लक्षात येईल , एक ठोस राजकीय कृती करणाऱ्या युवकांना 'वेडी पोरं' किंवा 'वाट चुकलेले' म्हटलं गेलंय, इथून पुढेही म्हटलं जाईल.

भगत : मी तर म्हणतो त्यांनी शिकावं. खूप वाचावं, भटकावं, भरपूर खेळावं, कोणालाही न घाबरता मनसोक्त प्रेमदेखील करावं. पण त्याचबरोबर त्यांनी राजकारणाचे धडेही गिरवावेत.

दुर्गा भाभी : खरंय तुझं. लोक काय म्हणतील याचा विचार करत राहिला तर आजचा युवावर्ग कुठंच जाऊ शकणार नाही.

(यशपाल आणि सुखदेव यांच्यामध्ये चुळबुळ सुरु आहे)

भगवती : काय चाललंय रे तुमचं?

यशपाल : भाई, मला सगळं मान्य आहे पण , माझ्या नालायक मित्रांनी इथं काहीतरी खायला मिळेल हे आमिष दाखवून मला इकडं आणलंय , तेव्हा... (सुखदेव त्याला गप्प करण्याचा प्रयत्न करतो, सगळे हसतात.)

दुर्गा भाभी : (हसत) एक नंबरचे नमुने आहात. बकासुर कुठले. चला, मी लागते तयारीला स्वयंपाकाच्या, पण प्रत्येकाला काम करावं लागेल तरच मिळेल खायला.
(सगळे मान हलवतात, हसतात)

(अंधार)

**(दृश्य ५)**

[हॉस्पिटल १९६५, पहिला माणूस हाच मार्कंड त्रिवेदी आहे, कँटीनच्या प्रसंगामध्ये आपण याला पाहिलं आहे.]

(म्हाताऱ्याचे डोळे पाणावले आहेत, डोळे पुसतो.)

मार्कंड : माफ करा, आपल्याला उगाच त्रास दिला.

म्हातारा : नाही, असं काही नाही. आठवणी इतिहास आणि राजकारण या दोहोंच्या परे असतात. कदाचित म्हणूनच त्या आठवणी असतात . माणसं जेव्हा वयाच्या विशिष्ट टप्प्यावर पोहोचतात ना तेव्हा या आठवणीच त्यांना जिवंत ठेवतात . मी त्यावेळी लाहोरमध्ये नव्हतो पण जेव्हा ऐकतो तेव्हा दरवेळी नवीन काहीतरी ऐकतोय असं वाटतं. इकडे ये, बैस.

मार्कंड : (कोरडेपणाने) मला माझी लायकी माहीत आहे, मी उभाच ठीक आहे.

म्हातारा : तुला मी अजूनही ओळखू शकलो नाही.

मार्कंड : मीच स्वतःला ओळखू शकलेलो नाही.

म्हातारा : माझ्याकडे का आला आहेस?

मार्कंड : इतिहासात ना माझी कोणती जागा आहे, ना माझा इंटरेस्ट. मला इंटरेस्ट आहे तो त्या काही क्षणांमध्ये जे खूप आधीच थांबले होते आणि अजूनही तिथेच थांबल्यासारखे भासतात. काही गोड, काही कडू. ते गोड क्षण वाटून घ्यायला खूप जण भेटले पण ते कडू क्षण...

म्हातारा : (हसत) ते कडू क्षण वाटायला तू या म्हाताऱ्याकडं आलास आणि हा म्हातारा आपल्या पाठीच्या हाडांचा कॅन्सर घेऊन आयुष्याची शेवटची घटका मोजत आहे.

मार्कंड : माझ्या या डोळ्यांनी बघतोय , विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात ज्या माणसाने अक्खा हिंदुस्थान हादरवला होता . त्याला आज या हॉस्पिटलचा वॉर्डबॉयदेखील ओळखत नाही.

म्हातारा : आता माझी अशी कोणती इच्छा देखील राहिली नाही . जेव्हा होती तेव्हाच ती पूर्ण झाली. ती पूर्ण करणे हेच आमचं त्यावेळचं उद्दिष्ट होतं.

मार्कंड : तुमचं उद्दिष्ट? काय होतं ते? दुसऱ्यांना खिजवणं? इतरांना कॉम्प्लेक्स देणं? पंडित चंद्रशेखर आजादला हनुमानाचा अवतार म्हणणं? सुखदेवला इतरांची कशीही चेष्टा करू देणं? भगतच्या इन्टलेक्ट समोर बाकी सर्वांना खुजं ठरवणं? आपल्या उत्साहापुढं समोरच्या माणसाचं व्यक्तिमत्व पायदळी तुडवून पुढं जाणं ? का कोणाही ऐऱ्यागैऱ्याला ‘भाई बम्पूलाट’ सारख्या जीवघेण्या मस्करीत गुंगवून त्याला रडवणं?

म्हातारा : अरे, तू ‘भाई बम्पूलाट’ला पण ओळखतो?

मार्कंड : (मोठ्याने हसतो, अजून उन्मादाने बोलू लागतो) काय होतं ते? काय होतं ते? हां.. “लेट अस प्लेज अवर लाईफ्स टू अवर कंट्री”. कायपण वाक्य होतं. आजकाल हे असले सुमार डायलॉग थर्डक्लास फिल्मचे हिरो मारतात.

(मंचावर एका कोपऱ्यांत म्हाताऱ्याच्या भवतीने प्रकाश, बाकी अंधार)

म्हातारा : (वेड्यासारखं बडबडतोय, बडबडीचं रूपांतर मोठ्या हसण्यात होतंय.) लेट अस प्लेज अवर लाईफ्स टू अवर कंट्री...लेट अस प्लेज अवर लाईफ्स टू अवर कंट्री.

(संगीतासोबत बाहेर वादळी हवा सुरु होते, अंधारात पात्रं प्रवेश करतात.)

म्हातारा : मला अजूनही आठवतंय, १९२४ च्या डिसेंबरची वादळी रात्र होती, कानपूरमध्ये गणेश शंकर विद्यार्थींच्या ‘प्रताप प्रेस‘ मध्ये तो उभा होता...

**(दृश्य ६)**

[मंचाच्या मधोमध अंधुक प्रकाश, भगत उभा आहे, चेहरा अस्पष्ट. आवाज ऐकू येऊ लागतो]

भगत : आदरणीय पिताजी, नमस्ते.
माझं आयुष्य स्वातंत्र्याच्या विचारांच्या उच्च ध्येयासाठी अर्पण करण्यात आले आहे. त्यामुळे आरामदायी आणि प्रापंचिक सुखांचं आकर्षण यांना माझ्या आयुष्यात काहीच जागा नाही. तुम्हाला आठवत असेलच, की लहान होतो तेव्हाच आजोबांनी मला देशसेवेसाठी अर्पण केलं होतं, म्हणूनच मी त्यावेळेची प्रतिज्ञा पूर्ण करत आहे. तुम्ही मला माफ कराल अशी आशा आहे.

तुमचा आज्ञाधारक,

[प्रकाश उजळतो, भगतचा चेहरा स्पष्ट दिसतो]

(बिस्मिलचा आवाज ऐकू येतो) भगतसिंह!

**(दृश्य ७)**

[आसपास अंधारात बसलेल्या लोकांचे चेहरे दिसत नाही आहेत, त्यांचा फक्त आकार लक्षात येतोय, एका कोपऱ्यात म्हाताऱ्यावर प्रकाश]

बिस्मिल : (अंधारात) का यायचं आहे तुला 'एचआरए'मध्ये?

भगत : ज्या कारणासाठी तुम्ही लोकं आलात.

बिस्मिल : तुझं कारण सांग.

भगत : सगळ्यांचं कारण एकच, देशाचं स्वातंत्र्य.

बिस्मिल : कसं मिळणार?

भगत : लढावं लागेल.

बिस्मिल : अंधारात तीनचार इंग्रज पोरांना चोप देण्याला लढणं म्हणतोस? (हसतो)

भगत : ती सुरुवात होती आणि कधी ना कधी सुरुवात तर करावीच लागते.

अशफाकउल्लाह : गेले शंभर वर्षे लढतो आहोत, अजून तरी मिळालं नाही स्वातंत्र्य?

भगत : कदाचित लढण्याच्या पद्धतीमध्ये चूक असेल.

अशफाक : (हसत) आणि ती चूक सुधरवण्यासाठी तू आला आहेस.

भगत : का नाही? आधीच्या चुका सुधरवायला कोणी ना कोणी येतच राहणार.

बिस्मिल : ते ठीक आहे, लग्नात शहीद होण्यापासून वाचला आहेस का बरखुरदार?

(सगळे हसतात)

भगत : (स्मितहास्य) शहीद व्हायचंच आहे तर कमीत कमी प्रेमिका तरी आपल्या पसंतीची असावी.

(सगळे हसतात.)

अशफाक : हे तुझं तरुणपण बोलतं आहे बाकी जोपर्यंत प्रेमिका आणि मृत्यू यांना सामोरे जात नाही, तोपर्यंत त्यातला फरक लक्षात येत नाही.

भगत : मी कशालाही सामोरं जायला घाबरत नाही.

बिस्मिल : मित्रा, मरताना खूप यातना होतात.

भगत : तुम्हाला कसं माहीत ? तुम्ही मेलाय का कधी ? (शांतता) (बिस्मिल अस्वस्थ होतो) थोडक्यात, मरणाबद्दल जितकं मला माहीत आहे तितकंच तुम्हालाही . तेव्हा आपला हिशोब बरोबर.

बिस्मिल : (अस्वस्थपणे) या खोलीत असणारा प्रत्येकजण कधी ना कधी कमी जास्त प्रमाणात मेलेला आहे. त्यांच्या शरीरावरचे घाव त्याचीच साक्ष देतात.

भगत : अंगावरचे घाव माणसाच्या ताकदीची साक्ष देत नाहीत, जनाब. ताकद देणाऱ्या गोष्टी नक्कीच याहून वेगळ्या आहेत. रक्त सांडण्यात कसलं एवढं कर्तृत्व? मग ते स्वतःचं असेल किंवा दुसऱ्याचं . अंगातून पडणारा प्रत्येक थेंब येणाऱ्या पिढयांच्या रक्तातून ज्वालेसारखा उसळून येणार आहे का नाही हे जास्त महत्त्वाचं. माणसाचं आयुष्य अनमोल आहे. हसत हसत फासावर जाणं नक्कीच प्रचंड हिमतीचं काम आहे.. पण हुशारीचं नाही. योग्य वेळ आणि संधी

साधल्याशिवाय स्वतःचं आयुष्य गमावणं हा मूर्खपणा आहे . भारतीय स्वातंत्र्याच्या शंभर वर्षाच्या इतिहासात कदाचित हीच चूक राहून गेली असेल.

(शांतता, बिस्मिल उठून भगतकडे जातो, हात मिळवतो.)

बिस्मिल : हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशनमध्ये तुझं स्वागत असो!

[मंचावर पूर्ण प्रकाश. कोपऱ्यात म्हाताऱ्यावरचा प्रकाश अजूनही आहे; चेहऱ्यावर हसू.]

बिस्मिल : माझं नाव रामप्रसाद बिस्मिल.

अशफाक : मी अशफाकउल्लाह खान. (भगत हात मिळवतो.)

बिस्मिल : हा शिव वर्मा. याला बघितलंस का? याला एचआरएचा काडी पैलवान म्हणतात. (सगळे हसतात) आणि तो (कोपऱ्यातील म्हाताऱ्यावरचा स्पॉट मोठा होतो) तो आहे एचआरएचा खास बंगाली बाबा, बटुकेश्वर दत्त.

दत्त : (आनंदाने हसतोय) भालो आछीश?

बिस्मिल : (भगकडे बघत) तुला विचारतोय, कसा आहेस?

भगत : (नम्रपणे) छान आहे.

बिस्मिल : बंगाली लोक आणि हनुमान, यांच्यात काय फरक आहे तुला माहीत आहे?

भगत : नाही, काय?

बिस्मिल : काहीच नाही. दोघांना जोपर्यंत त्यांच्या ताकदीची जाणीव करून देत नाही तोपर्यंत हे संजीवनी आणायला तयारच होत नाहीत. पण एकदा तयार झाले, की मग मात्र ते संजीवनी सोडून अक्खा डोंगरच घेऊन येतात . (सगळे मोठ्याने

हसतात) अरे, हनुमानावरून आठवलं, हा पंडित कुठं गेला?

[मंचावरचा प्रकाश कमी होतो, मागच्या पडद्यावरच्या सावलीत एका माणसाची मोठी आकृती सोटा फिरवताना दिसते.]

बिस्मिल : हे आहे एचआरएचं भूत , साखळदंड असो वा मृत्यू याला आजपर्यंत कॉणीच पकडू शकलं नाही आणि शकणार देखील नाही.
(आवाज देतो) पंडित...

आकार : (व्यायाम करत) आ ऽ हो

बिस्मिल : भगतसिंहला भेटणार का?

आकार : व्यायाम करताना नाही. (सगळे हसतात.)

भगत : (नम्रपणे) यांचं नाव काय?

[मंचावरचा प्रकाश जातो. कोपऱ्यातून दत्त मोठ्या आवाजात)

दत्त : पंडित चंद्रशेखर आजाद.

[संगीत ऐकू येऊ लागतंय, रेल्वेच्या शिटी सोबत संगीत वाढत जातंय, एकत्र वाढत जाऊन अचानक बंद पडतं, मंचावर प्रकाश आणि कोरस सुरु.]

सरफ़रोशी की तमन्ना अब हमारे दिल में है
देखना है ज़ोर कितना बाजुए कातिल में है
वक्त आने पे बता देंगे तुझे ऐ आसमां
हम अभी से क्या बताएं क्या हमारे दिल में है ..
देख फांसी का ये फंदा खौंफ से है कापता
उफ कि जल्लादों की हालत भी बड़ी मुश्किल में

नर्म स्याही से लिखे शेरों की बातें चुक गईं
इक नई बारूद से लिखी ग़ज़ल महफ़िल में है
देखना है जोर कितना..

[गाणं हळू होतं.]

**(दृश्य ८)**

दत्त : आणि मग तो दिवस आला, ९ ऑगस्ट १९२५, त्या दिवशी शहाजहानपूरहून लखनौला आठ नंबरची डाऊन पॅसेंजर निघाली, ज्यात होता सरकारी खजिना. गाडीत असणारे एचआरएचे सदस्य वाट बघत होते एका छोट्या स्टेशनची , ज्याचं नाव होतं, काकोरी.

[कोरस वाढतो.]

आँख से टपकी लहू की बूंद को ले हाथ में
सर कटा दें ऐ वतन बस ये ही हसरत दिल में है
जिंदगी के रास्तों पे ख़ूब यारों चल लिए
अब जरा देखें छुपा क्या मौत की मंजिल में है...

[गाणं अचानक थांबत, विद्यावतीचा आवाज ऐकू येतो]

विद्यावती : (ओरडते) अहो, ऐकलंत का? काकोरीला सरकारी खजिना लुटला गेला म्हणे . आपली पोरं तिकडेच कुठं तरी जाणार होती ना?

[मागील पडद्यावरील सावलीमध्ये एका इंग्रज सार्जंटचा आकार येतो, मोठ्याने ओरडतो आहे.]

आकार : नो! नो! नो! टाइटन दि सिक्योरिटी! क्लोज ऑल दि स्टेशन्स बिटवीन शाजानपूर अँड लकनौ! रेड मेरठ अँड बनारस! रिक्रूट न्यू एजन्ट्स इन डेल्ही, आगरा, ग्वालीयार अँड झांसी! सेंड वन स्क्वाड टू कैलकाटा! धिस इज दि सेम ब्लडी

हिंदुस्थान रिपब्लिक असोशिएशन! पिक अप दॅट बास्टर्ड सन्याल! कॉल स्पेशल फोर्स! आय वॉन्ट टू सी सीआयडी स्लीयुथ्स इन इच अँड एव्हरी स्ट्रीट ऑफ कानपूर! व्हॉट? व्हॉट?

[मागची सावली जाते, दिल्ली, सफदरजंग १९६५]

मार्कंड : (झटक्याने पुढे जातो आणि त्यांना पकडतो) दत्त साहेब.

दत्त : व्हॉट? (त्याच्याकडे वेड्यासारखा बघत राहतो). सगळं संपलं, पंडितजी आणि मुकुंदीलाल सोडून संपूर्ण एचआरए पकडली गेली . हिंदुस्थान रिपब्लिक असोशिएशनचा एक सुवर्ण अध्याय संपला.

[मार्कंड त्यांना हळू हळू पलंगावर बसवतोय. हळू हळू प्रकाश मंदावतो; अंधार.]

**(दृश्य ९)**

(भगतचा आवाज येऊ लागतो, मंचावर प्रकाश उजळतो. डेअरी फार्म, लाहोर.)

भगत : (हातात कागद पेन्सिल) दुधाचा भाव?

सुखदेव : (कणीस खात) एक आण्याला शेर.

भगत : चारा किती लागला?

सुखदेव : बावीस शेर

भगत : दूध किती आलं?

सुखदेव : अठरा शेर

भगत : शहरात किती गेलं?

सुखदेव : बारा शेर

भगत : फक्त? आणि बाकीचं...?

सुखदेव : (कणीस चावत) बाकी देशातील तरुणांनी प्यायलं.

भगत : आणि जर का हे देशातल्या म्हाताऱ्याला कळलं तर तो आपलं कंबरडं मोडेल.

[बाहेरून सरदार किशन सिंहांचा आवाज]

आवाज : आहे को कोणी आत...?

(सगळे लगबगीने उठतात, कामं करायला लागतात, सुखदेव कणीस फेकून काहीतरी हिशोब करायला सुरु करतो, किशन सिंह आणि अजून दोघं तिघं वयस्कर माणसं आत येतात)

सगळे : पैरी पोना बाऊजी..पैरी पोना (पाया पडतात.)

किशन सिंह : (आनंदाने) दीर्घायुषी व्हा, पोरांनो. भगत, हे बघ तुला भेटायला मन्नावाले आलेत.

भगत : नमस्कार काका, सतश्री अकाल..

मन्नावाले : (हसून) सतश्री अकाल.. पोरा

किशन सिंह : बघून घ्या. अक्खा शंभर गज तुकडा घेतला आहे , तीन म्हशी आहेत परवाच एक रेडकू झालंय. अक्ख्या लाहोरला जातंय आपलं दूध.

मन्नावाले : वा, खूप छान. पोलिसांचा वगैरे त्रास नाही ना आता?

भगत : (हलके हसतो) जी नाही, आता जामीन झाल्यानंतर काहीच त्रास नाही.

किशन सिंह : दौलतरामनी साफ सांगितलं आहे, की ही केस तर त्यांच्या बापाला पण मागे घ्यावी लागेल. तसंही या गोऱ्यांच्या कोर्टात केस सहा -सात महिन्यांच्या वर चालतंच नाहीत.

मन्नावाले : मुळात त्यांच्याकडे पुरावाच नाही ना कोणताही . कसलीही काळजी नको , प्रपंचाला लागा आता.

किशन सिंह : काय म्हणता आहेत ते नीट ऐका सगळ्यांनी . प्रपंचाला लागा आता. साल्यांनो, नशिबानं संधी चालून आली आहे तुम्हाला. काय भगवती, ठीक आहे ना सगळं?

भगवती : हो बाऊजी, तुम्ही काळजीच करू नका.

किशन सिंह : आणि तू रे सुखदेव, पारा उतरला का नाही तुझा अजून?

सुखदेव : एकदम थंड. तुम्हाला सांगतो बाऊजी थंडगार दूध प्यायलं की असं..

किशन सिंह : (चिडून) अरे हरामखोरांनो, तुमच्यासाठी नाहीये हे दूध, थंडगार म्हणे. भगवती याच्यावर लक्ष ठेव जरा.

भगवती : हो, बाऊजी.

किशन सिंह : (हसत) आता याच्यासाठीपण एखादी पोरगी बघा तुम्ही , पोरगं जवान आहे. (सगळे हसतात) भगत मन्नावाले विचारता आहेत तारीख पक्की करायची का म्हणून?

(भगत स्मितहास्य, काहीच बोलत नाही.)

(अंधार)

**(दृश्य १०)**

[कानपूर. आजाद चिडून फेऱ्या घालत आहेत.]

आजादः (चिडून) एक अटक काय झाली, अवसान गळालं? दम निघाला साल्याचा. या १९२७ च्या पेटलेल्या वातावरणात लाहोरला दूध पाजता आहेत नव-क्रांतिकारी.

दत्त : पंडितजी, ती डेअरी तर त्याच्या वडिलांनी सुरु करून दिली आहे.

आजाद : (ओरडतो) बापाची परवानगी घेऊन आला होता का क्रांती करायला ? साला ऑर्गनायजेशनच्या अनेक गुप्तगोष्टी बाहेर घेऊन गेला , कशाला? दूध विकून, लग्न करून , पोरं काढून लोकसंख्या वाढवायला ? हरामी साले , एचआरए कुरतडून गेले.
(चिडून फेऱ्या घालतात. काही वेळाने) काय नाव रे त्याचं? यांना आवडणारा तो चार फुटी अमेरिकन ड्रामेबाज?

राजगुरु : (पटकन) चार्ली चॅप्लिन

आजाद : हां हां तोच, त्याची फिल्म बघून क्रांती आणणार हे.

राजगुरू : (खालच्या आवाजात) पण तो तर खूप महान कलाकार..

आजाद : (ओरडतो) जोड्याने हाणीन..

राजगुरू : (मान खाली घालून) मी नाही, सुखदेव म्हणत होता.

[काही काळ जातो; कुणी काही बोलत नाही. आजाद वळतात.]

आजाद : दसरा बॉम्ब केसचा चार्ज लावलाय ना?

शिव वर्मा: हो, मुद्दामून गोवलाय त्याला, सरकारचंच काम आहे हे पंडितजी. त्यांना भगतला पकडायला, त्याच्यावर मोठी केस करायला कारणंच हवं होतं.

यशपाल: त्यांना काकोरी ॲक्शन मधली नावं हवी होती, पण भगतनं काही सांगितलं नाही, पंडितजी.

आजाद : उपकार.. उपकारच केले म्हणायचे.

राजगुरू : (खालच्या आवाजात) खूप मारला तरी नाही बोलला.

आजाद : सहन करा, करावंच लागेल. नाहीतर घरी जा आणि बायकोच्या परकराच्या नाड्याशी बांधून घ्या स्वतःला ... नाही! मी नाही विसरणार हे . माझ्या आयुष्यातला सगळ्यांत मोठा धोका दिलाय यानी. (अचानक वळून) ठीक आहे, ठरलं तर राजगुरू.

राजगुरू : काय?

आजाद : तू आजच लाहोरसाठी निघतो आहेस . एकदा शेवटचं बोलून बघ त्याचाशी.. ऐकलं तर ठीक, नाहीतर, (आवाज अडकतो, खालच्या स्वरात) नाहीतर 'भाई बम्पूलाट'ला सोबत घेऊन जा, उपयोग होईल.

यशपाल: (पुढे येऊन) पंडितजी, तुम्हीच एकदा बोलून घेतलं असतं तर.

आजाद : बास, याचा निर्णय झाला आहे. (हातातले कागद खाली फेकून देत) स्साला हा दिवस पण बघायचा होता.

(प्रकाश मंदावतो)

**(दृश्य ११)**

[मंचाच्या एका बाजूला प्रकाश उजळतो. डेअरी, लाहोर. भगत आजादचं पत्र वाचतोय; बाकी बाजूने उभे आहेत. आजादचा आवाज]

आवाजः ..मला आशा आहे, की आतापर्यंत तुझी डेअरी कर्जात बुडाली असेल, कारण तुम्ही दूध विकायचं सोडून बाकी सगळंच करत असाल... तुला क्रांतीचा कंटाळा आला आहे हे समजल्यापासून खूपच खुश आहे मी . अशावेळी जरा माझ्या समोर यायचं, दोन हात करायचे, बरं असतं ते जीवाला. लवकरच तुझ्यावरची केस काढून घेणार आहेत असं ऐकलं. जामिनाचे पैसे परत मिळण्याबद्दल तुझं आधीच अभिनंदन. इथून पुढं बापाची चेष्टा करायची असेल तर एक लक्षात ठेव की त्यांनी तुम्हाला जन्माला घातला ना की ...

[भगत, सुखदेव, भगवती, यशपाल.. सगळे जोरात हसतात]

भगवतीः (हसत) चंद्रशेखर आजादनी भगतसिंहला समजवायला 'भाई बम्पूलाट'ला पाठवला होता, इतिहासाला हे कधी मान्य होईल का?

भगत : (हसत) भाई बम्पूलाट खचाखच भरून आले होते; असं वाटतं होतं आत्ता ठोकतील.

राजगुरू : (भोळेपणाने) पण तुम्ही लोकांनी हे असं केलंच का?

भगतः अरे हुशार माणसा, तू म्हणजे पण .. ऐक, माझी साठ हजार रुपयांची जमानत दिली आहे. ती सुध्दा बॅरिस्टर दुनीचंद आणि दौलतराम सारख्या प्रतिष्ठित लोकांनी, आता मला सांग जर सहा महिन्यात मी अजून काही उचापत्या केल्या तर समाजात परत त्यांच्या शब्दाला मोल राहिला असता का?

सुखदेवः आणि मला सांग इथून पुढं कोणी पकडलं गेलं तर त्यांची जमानत द्यायला कोण

येणार मग? पैशाच्या बाबतीत आपली पार्टी आधीच कंगाल आहे. अजून एक दरोडा घालावा लागेल.

भगतः बाकी यशपालनं असेम्ब्ली मधून केस काढलीच आहे. आज उद्या जमानत परत मिळेल. बस, मग पुन्हा इन्कलाब सुरु. पण हे भारीच काम झालं. (हसतो) पंडितजी... जिंदाबाद.

[पत्र वाचू लागतो]

आता महत्त्वाची गोष्ट, दिल्लीत फिरोजशहा कोटलाची मिटिंग नक्की झाली आहे. उत्तर भारतातल्या सगळ्या दलांमध्ये या मिटिंगविषयी फार उत्साह आहे. बंगाल सोडल्यास बाकी सगळे लोक येत आहेत. मिटिंग तू लीड करतो आहेस. क्रांतिकारी आंदोलनात हे एक महत्त्वाचं वळण ठरेल अशी मला आशा आहे . निर्णय जो काही असेल तो मला मला मान्य असेल.

तुमच्या सगळ्यांचा,
पंडित.

ता. क. - पुढच्या वेळी भेटशील तेव्हा या 'सोशलिजम' शब्दाचा अर्थ अजून स्पष्ट करशील. रशियन क्रांतीवर काही पुस्तकं असतील तर फारच उत्तम. पुस्तके हिंदीत असतील ही काळजी घे.

**(दृश्य १२)**

[एका मोठ्या गरजणाऱ्या संगीतासोबत दृश्य बदलते. बोलण्याचा आवाज येतोय. फिरोजशहा कोटला, दिल्ली]

भगवती : मि. घोष, परकियांच्या गुलामीतून भारताला मुक्त करणे यासाठी आपण कटिबद्ध आहोत आणि त्यासाठीच क्रांती. क्रांती ही अशी अद्भुत गोष्ट आहे , की जिच्याविषयी निसर्गाला प्रेम असतं. तिच्याशिवाय ना निसर्गामध्ये प्रगती होते ना मानवी व्यवहारांमध्ये. क्रांती म्हणजे निराशेपोटी जन्मलेलं एखादं तत्त्वज्ञान नव्हे.

ती एक ठोस आणि जिवंत शक्ती आहे. नवे आणि जुने, प्रकाश आणि अंधार यांतील आंतरिक द्वंद्व, निरंतर संघर्षाचा तो एक अविष्कार आहे.

फनींद्रनाथ घोषः आपले ऐतिहासिक, अध्यात्मिक बळ खूप मोठं आहे मग क्रांतीसाठी आपण दुसऱ्या कोणाकडून का प्रेरणा घ्यायची?

भगतः कारण त्या देशाकडे देण्यासाठी एक विचारसरणी आहे. जिच्यामुळे तिथे क्रांती आली आहे.

मि. घोष, रशियन क्रांती ही न केवळ गेल्या दशकातील , मी तर म्हणेन या शतकातील सर्वात महत्त्वाची घटना आहे. मला सांगा, बंगालने क्रांतीची पहिली शिकवण महाराष्ट्राकडून नाही घेतली...? पंजाबने क्रांतीची पहिली शिकवण बंगालकडून नाही घेतली? मग आपण एखाद्या वैज्ञानिक कसोटीवर सिद्ध गोष्टीला स्वीकारण्यासाठी का कचरतोय?

घोष : परंतु मिस्टर सिंह, या सोशलीजम नावाच्या शास्त्रात धर्माला काहीच स्थान नाही जे की आपल्या समाजाचा अविभाज्य घटक आहे , देशाची एक महान परंपरा आहे.

भगत : महान परंपरा?? गरिबी, भूक, अस्पृश्यता. ही आहे आपल्या देशाची महान परंपरा. आपल्या देशासारखी दुर्दशा आज कोणाचीही नसेल . ३० कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात ६ कोटी लोकांना अस्पृश्य मानले जाते . एकीकडे आपण अध्यात्माचे गाणे गातो आणि दुसरीकडे माणसाला माणसाचा दर्जा देखील देत नाही. प्रगती घडवायला सज्ज ठाकलेल्या माणसाला जुन्या श्रद्धेतील प्रत्येक बाबीबद्दल टीका करावीच लागेल, तिला आव्हान द्यावे लागेल. या जाती धर्मानी हिंदुस्थानाला संकटाच्या खाईत लोटलं आहे ; पण आपण अजूनही त्यांना आमच्या श्रद्धा म्हणून गोंजारत राहतो.

घोष : असं कसं म्हणू शकता तुम्ही ? या श्रद्धेमुळे तर माणसाचा देवावरचा, त्याच्या स्वतःवरचा विश्वास दृढ होतो.

भगत : देवावरच्या विश्वासात माणसाला सांत्वन व बळकट आधार मिळतो. समाजाच्या आदिम अवस्थेच्या काळात हे उपयोगीदेखील होते , पण देवाशिवाय ... देवाशिवाय माणसाला स्वतःवरच अवलंबून रहावं लागतं. तुमच्या आजूबाजूला जेव्हा प्रचंड वादळ सुरु असतं तेव्हा इतर कसल्याही कुबड्या न घेता स्वतःचे पाय जमिनीत रोवून उभं राहणं हा काही पोरखेळ नव्हे.

घोष : अरे, पण त्यामुळे एक आध्यात्मिक शक्ती मिळते माणसाला.

भगत : आणि तुमच्या या साऱ्या शक्ती मिळून एकवेळची भूक देखील भागवू शकत नाहीत.

घोष : भुकेला का इतकं महत्त्व देता तुम्ही?

भगत : भूक हे एक भौतिक सत्य आहे . फरक इतकाच आम्ही ती भूमिका घेऊन स्पष्टपणे बोलतो, तुम्ही आपल्या बोलण्याने कुणी दुखावला जाईल या भीतीने स्पष्ट बोलणं टाळता.

घोष : ते ठीक आहेम पण बहुतांश लोकांना भौतिक सत्याच्या मार्गावरून जाणं अवघड वाटतं त्यांना मायथॉलॉजीमध्ये जास्त रस असतो , त्यांच्या कलानं जावं हे बरं नाही का?

भगत : त्याला जबाबदार हा मधला दोन हजार वर्षांचा काळ आहे. राज्यसत्तेला शासन करण्यासाठी जे सोयीचं असतं त्याला दैवी इतिहासाचा दाखला देण्याचं काम धर्मसत्ता करते. त्याबदल्यात राज्यसत्ता धर्मसत्तेला उचलून धरते . दोघंही एकमेकांना टिकवण्यासाठीच काम करत असतात. या अशा बेमालूम केल्या जाणाऱ्या भेसळीमुळे इतिहास आणि दंतकथा यामधील फरक अस्पष्ट होत जातो. आणि आपणही हेच करणार असू तर ते पूर्णपणे अनैतिक ठरेल.

सुखदेव : आणि मी काय म्हणतो घोषबाबू, आपल्याकडे मायथॉलॉजी कशीही तयार होऊ शकते; त्यात काय एवढं विशेष ? उद्या समजा तुम्ही भारतीय स्वातंत्र्य

आंदोलनातील सर्वात महत्त्वाचे व्यक्ती वगैरे झालात तर अजून पाचएकशे वर्षांनी तुमच्याविषयीच दंतकथा तयार झाली असेल, की ८ ऑगस्ट १९२८ रोजी फिरोजशहा कोटल्याला जी मिटिंग झाली , त्यामध्ये फनिंद्रनाथ घोष हवेतून उडत आले होते.

(सगळे हसतात)

घोष : (चिडून) यु पर्सन्स आर इम्पॉसिबल. तुमच्याशी बोलून काहीच फायदा नाही.

सुखदेव : जेव्हा स्वतःकडे वैचारिक स्पष्टता आणि तर्कसुसंगत विचार नसतात , त्यावेळी कुणाशीच बोलून फायदा होत नाही.

घोष : ते जाऊदे, सोशालिजमच्या व्यावहारिकतेविषयी काय म्हणशील?

भगत : याविषयी मी पुन्हा सांगतो, भारताला फक्त स्वातंत्र्य गरजेचं नाही. गरज आहे ती हे स्वातंत्र्य आपल्याला कसं मिळणारं आहे याची . भारत साम्राज्यवादाच्या जोखडाखाली भरडला जात आहे. सर्वहारा आणि शेतकरी वर्गाची स्थिती आज गंभीर आहे. गोरे जातील आणि भुरे येतील. श्रीमंत अजून श्रीमंत होतील आणि गरीब अजून गरीब. धर्म, जात आणि भाषेच्या नावाखाली देशभरात आगीचे इतके डोंब उसळतील, की ते विझवता विझवता येणाऱ्या पिढ्याच्या पिढ्या कोलमडून जातील. आणि म्हणूनच जनतेसाठी जनतेनं राजकीय सत्ता ताब्यात घेणं हे गरजेचं आहे . म्हणून फक्त स्वातंत्र्य महत्त्वाचं नाही . स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा भारतदेखील महत्त्वाचा आहे. आणि हे जर सत्यात आणायचं असेल तर सोशालिजमसारखं व्यवहार्य साधन नाही.

फनींद्र : ठीक, एक शेवटचा प्रश्न एच.एस.आर.ए.चा कमांडर इन चीफ मि. चंद्रशेखर आजादच का?

भगत : का नाही?

फनींद्र : त्या माणसाला एक ओळ बोलता येत नाही इंग्रजीची. कमांडर मुख्य प्रेरणा स्रोत असतो. तो शिकलेला हवा.

भगत : शिक्षण हे सब्जेक्टिव्ह असतं. काही लोकं मिशनरी स्कूलमध्ये शिकतात, काही जगण्याच्या अनुभवांतून.

फनींद्र : पण ते या मिटिंगला पण आले नाहीत?

भगत : याचं उत्तर यशपाल देईल.

यशपाल : पाटण्याला गेलेत. काल सकाळी दंड फिरवताना भेटले होते. मिटिंगची आठवण करून दिली तसं म्हणाले, "मी व्यायाम करताना माझ्याशी बोलतो आहेस, ही तुझी पहिली चूक. ११८ दंड झालेत आणि २०० होईपर्यंत मी थांबणार नाही. त्यानंतर दूध-जिलेबी खाणार, मग बंदूक साफ करणार आणि नंतर प्रश्नाचं उत्तर. आणि पार्टीमध्ये काय सुरु आहे याची माहिती ठेवत नाहीस, ही तुझी दुसरी चूक. नाहीतर तुला मी आज रात्रीच्या गाडीनं पाटण्याला जाणार आहे आणि त्यामुळं मिटिंगला येऊ शकणार नाही याची माहिती आधीच मिळाली असती, "पाटण्याला कुठं?" असं मी चुकून बोलून गेलो त्यावर म्हणाले की , "एकतर ते मला माहीत आहे आणि माझ्या 'भाई बम्पूलाट'ला . तिसऱ्या कोणाला माहीत व्हायच्या आधीच त्याला गोळी घालेन."

फनींद्र : हे भाई बम्पूलाट कोण?

सुखदेव : सहा राऊंड असतात त्यांचे, पंडितजींकडे दहा राउंडवाले आहेत.

(बाकीचे हसतात)

भगत : ठरलं तर मग, आजपासून हिंदुस्थान रिपब्लिक असोसिएशनचं नाव हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिक असोसिएशन होईल. आणि आपला पहिला कार्यक्रम असेल ३० ऑक्टोबरला. त्या दिवशी सायमन कमिशन लाहोरला पोहोचणार

आहे. कमिशन ज्या ज्या भागातून जाणार आहे त्या त्या भागात आपण जोमानं विरोध करायचा आहे आणि आपली घोषणा असेल 'सायमन कमिशन गो बॅक.'

[मंचावरचा प्रकाश कमी होतो, गायकाचा प्रवेश]

वक्त के पन्नो की रफ्तार का आलम
क्या पूछो सरकार...भागते रहते वो हर बार
गली -बाजार छोड़कर ..
साथ में लेकर चलते है वो बीती
उथल-पुथल की मार..
बला से रुके-चले कोई भी कारोबार छोड़ कर.
थाम लेते है वो तो सधी लगामे घड़ी-घड़ी की
रोक लेते हैं वो तो चढ़ी उठाने बड़ी-बड़ी भी
और जो आया कोई खौफनाक तूफानी नाला
थपक के सुला-सुला देते है लहरें बढ़ी-चढ़ी भी
उन्हें तो कहाँ हुआ है भूले बिसरे मौसम रुत
से प्यार, वो तो बस चलते जाते
पतझड़ और बहार छोड़ कर
वक्त के पन्नों की रफ्तार

[गाण्याचा आवाज कमी होत जातो. सायमन कमिशन गो बॅकच्या घोषणा ऐकू येऊ लागतात.]

(अंधार)

**(दृश्य १३)**

[मंचावर प्रकाश, किशन सिंहचं घर]

विद्यावती : कृपाण घेऊन जायची आहे का सोबत?

किशन सिंह : नाहीतर काय? कृपाणाशिवाय सरदार म्हणजे मुकुट नसलेला राजा. आणि मी काय तुझा महामूर्ख पोरगा वाटलो का? शीख असून केस कापले गाढवानं. अरे, त्या लालाजींना म्हणायचं खरा क्रांतिकारी . वाघ म्हातारा झाला तरी वाघ असतो. आज काय शानदार मोर्चा काढलाय. वा! उसळत्या आगीचा डोंब जणू.

विद्यावती : सुखदेव आणि भगवतीपण आहेत की त्यांच्या सोबतीला?

किशन सिंह : त्या हरामखोरांचं नाव नको घेत जाऊ घेत जाऊ माझ्यासमोर . लालाजींच्या पायातल्या चपलेची लायकी नाही त्यांची.

विद्यावती : (हळू आवाजात) पण भगत तर लालाजींविषयी काहीतरी वेगळंच बोलत होता.

किशन सिंह : (चिडून) मी बोलतोय तेवढं पुरेसं नाही का ? काय जमाना आलाय? या ४५ वर्षाच्या सरदारावर विश्वास नाही पण त्या २० वर्षाच्या पोरावर आहे. चांगल्या घरच्या पोरीचं वाटोळं करायला निघालाय.

विद्यावती : तुम्ही तिला समजावत का नाही, की दुसरीकडे कुठे लग्न कर म्हणून?

किशन सिंह : (चिडलेल्या स्वरात) माझं स्वतःचं पोरगं माझं ऐकना झालंय आणि म्हणे तिला समजवा. ही आजची पिढी मला तर काही समजलेलीच नाही . काय खाऊन जन्माला आलीय कोणास ठाऊक. कालपर्यंत याच लालाजींच्या विरोधात लेख लिहून टीका करत होते आणि आज त्यांनाच पोलिसांपासून वाचवायला निघालेत, जणू स्वतःच्या बापालाच वाचवत आहेत.

विद्यावती : भगत तर म्हणत होता, की लाहोरचा मोर्चा आमच्या नौजवान भारत सभेने सांभाळलाय.

किशन सिंह : (काही क्षण शांत राहून, थकलेल्या आवाजात) हो हो, सांभाळलाय. त्या अजितचाच भाचा ना हा. भगतला आंदोलन, मोर्चे जे काय करायचंय ते करुदे, पण इथं करुदे. त्याच्या काकासारखं आयुष्यभर देश सोडायला लागला नाही

म्हणजे मिळवलं. वीस वर्षं झाली त्याला फरार होऊन , घरी तरुण बायको सोडून गेला. बिचारी वाट बघून बघून म्हातारी झाली.

[किशन सिंह जातो, मंचावर मोठ्याने घोषणांचे आवाज, मंचावर अंधार. जोरजोरानं घोषणा, संगीत वाढतंय, अचानक सगळं शांत. मागून विद्यावतीची किंचाळी , विद्यावतीः अहो.. ऐकलं का? लालाजींना मारलं त्यांनी]

**(दृश्य १४)**

(मोंताज)

(पहिला स्पॉट)

आजाद : नाव काय त्याचं?

भगवती : सुपरिटेंड स्कॉट.

दोघे : भगत.

(स्पॉट फेडआउट)

(दुसरा स्पॉट)

भगत : सुखदेव, भगवान दास आणि विजय त्याची यायची वेळ चेक करतील. त्याचा चेहरा कोण ओळखतो?

सुखदेव : जयगोपाल.

दोघे : जयगोपाल.

(स्पॉट फेडआउट)

(तिसरा स्पॉट)

सुखदेव : स्कॉट मोटरसायकलवरून येतो. डीएव्ही कॉलेज समोर तो आला , की जयगोपाल इशारा करेल. पिस्तूल कुणाकडं आहे?

भगत : राजगुरूकडे.

दोघे : राजगुरू.

(स्पॉट फेडआउट)

(चौथा स्पॉट)

राजगुरू : पहिली गोळी मी आणि भगत चालवणार . आमचा कोणी पाठलाग केला तर पंडितजी आहेत सांभाळायला. पंडितजी कुठं आहेत? (ओरडतो) पंडितजी..

(ड्रम बिट सोबत सर्व स्पॉट जातात, गोळी झाडल्याचा आवाज)

सुखदेव : (ओरडतो) जयगोपालने चुकीचा इशारा दिला, स्कॉट ऐवजी सॉण्डर्स मारला गेला.

आजाद : यमराज आणि यमदूत यांच्यात फार काही फरक नसतोच. लालाजींना तर या सॉण्डर्सनेच मारलं.

[मंचावर विद्यावतीच्या ओरडण्याचा आवाजः ऐकलंत का? आपल्या भगतवर खुनाचा आरोप आहे.]

(अंधार)

**(दृश्य १५)**

[भगत आणि सुखदेव समोरासमोर उभे आहेत, सुखदेव वळतो आणि मुली समोर येतो.]

सुखदेव : आदाब अर्ज है जी.

मुलगी : ओ हो, आजकाल सरदार उर्दू बोलायला लागले वाटतं. सतश्री अकाल म्हणता येत नाही का? ग्रंथीजींना कळालं तर अवघड होईल तुझं मग.

सुखदेव : मी कुठला सरदार, सरदार तर आत आहे. बोलवू का?

मुलगी : मी निघून जाईन हं.

सुखदेव : इतक्यात कुठं जायची गोष्ट करता? थोडा वेळ बसा इकडं, आराम करा, दूध, ताक वगैरे काही घेणार? उद्या आम्ही काहीच विचारपूस केली नाही, असं नको म्हणायला कुणी.

मुलगी : तुमच्याकडेच ठेवा तुमची विचारपूस. काकी आहेत का आत?

सुखदेव : काकीच हव्या आहेत की अजून कोणी?

मुलगी : ते म्हणतात ना काविळ झालेल्यांना जग पिवळं दिसतं. दुसरं काही सुचतंच नाही वाटतं आजकाल?

सुखदेव : (मोठा श्वास घेत) तसं सुचतं बरंच काही पण काही चेहरेच असे असतात ना.. एकदा समोर आले, की बाकी काही आठवतंच नाही.

मुलगी : (हसत) रोज गुरुद्वाऱ्यात जा, गुरुबानी एका, माथा टेकवून लंगरमधून प्रसाद घेऊन येत चला तेवढंच बरं तब्येतीला.

सुखदेव : गुरुबानीमुळे डोक्याचा इलाज होईल देखील... पर इस दिल का क्या करे जी?

मुलगी : (हसून) महंतजीना सांगून ठेवते मी उतरवतील तुमचं सगळं भूत. काकीना सांगा आज्जीनं बोलवलंय, येते मी, सतश्री अकाल.

सुखदेव : कोणीतरी इकडचं येतंय आमच्यापेक्षा त्याचाच हक्क जास्त आहे तुमच्या सतश्री अकालवर, त्यांना सांगून जा ना.

(अंधार)

**(दृश्य १६)**

[सफदरजंग हॉस्पिटल, मार्कंड समोर उभा आहे, सुखदेव पुन्हा भगतच्या समोर जाऊन उभा राहतो.]

मार्कंड : हाच माझा प्रश्न होता. त्याच्यावर खुनाचा आरोप होता. पण कोणाच्या खुनाचा? त्या सॉण्डर्सचा खून माहीत आहे इतिहासाला. त्या आरोपाने तर त्याला युगपुरुष केलं, पण, पण त्या बिचाऱ्या पोरीच्या स्वप्नाचं काय ? त्याची जबाबदारी कोण घेणार? शत्रूच्या रक्ताने होळी खेळणाऱ्या त्या महान योद्धयानं कधी मेहंदीच्या रंगाचा विचार केला होता का?

भगत : हे असं होणारच होतं . सुख, मी तुला आधीपासून सांगत होतो तिच्याशी चेष्टामस्करी करू नकोस म्हणून. यार, हे जामिनाचे दिवस फार महाग पडले आपल्याला.

मार्कंड : चोवीस तास बॉम्ब, काडतुसाचा वास घेणाऱ्या त्या योद्धयानं कधी गुलाबाच्या फुलाचा सुगंध घेतला असेल ? भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईची दिशा बदलवणाऱ्या त्या युगप्रवर्तकाला प्रेमाविषयी काहीच वाटलं नाही का?

भगत : मला वाटतं की माणसामध्ये प्रेमाची एक प्रगाढ भावना असायलाच हवी . मात्र, तिला एका व्यक्तीपुरती मर्यादित न ठेवता त्याने ती सर्वव्यापी बनवायला हवी . आशा आकांक्षानी भरलेल्या जीवनातल्या समस्त रंगानी मी ओतप्रोत भरलेलो आहे, पण वेळ येताच मी सगळं काही समर्पित करेन . प्रेमाच्या नैतिक पातळीबाबत मी असं म्हणेन, की ही एक भावनाच आहे, त्यापेक्षा ना अधिक, ना कमी. प्रेम हे जर खरं प्रेम असेल, तर ते माणसांचं व्यक्तित्व सदैव उदात्त करतं; ते कधीच अधःपतन करत नाही.

सुखदेव : माझ्याशी बोल, भगत. तू सुखदेवशी बोलतो आहेस हे लक्षात ठेव.

भगत : पण आजपर्यंत मी, मी खरंच एकही शब्द बोललो नाही तिच्याशी.

मार्कंड : उत्तर द्या, उत्तर द्या. स्वातंत्र्य संग्रामात त्या माणसाच्या खांद्याला खांदा लावून लढलात ना तुम्ही? मग तुमची जबाबदारी आहे ती. आता का शांत बसलात, मिस्टर बटुकेश्वर दत्त?

सुखदेव : त्याने काही फरक पडत नाही हे तूही जाणतोस.

भगत : याला जबाबदार आपण आहोत, हे नाही नाकारता येणार.

सुखदेव : त्याला आपण तरी काय करणार म्हणा, आपला संघर्ष आपल्याला वेगळ्या वाटेवर घेऊन गेला हेच सत्य.

भगत : (खंबीरपणे) मला वाटतं आपल्या वाटा आपणच निवडतो, बाकी कोण नाही.

सुखदेव : तुझ्या डोळ्यात मला काहीतरी वेगळंच दिसतंय भगत.

भगत : म्हणजे?

सुखदेव : ८ एप्रिलच्या ॲक्शनमध्ये भाग घ्यायला तू का नाही म्हटलास?

भगत : कोण म्हणलं? पंडितजींचा आदेश होता, की असेम्ब्लीत बॉम्ब फेकायला मी जायचं नाही म्हणून.

सुखदेव : बॉम्बची कल्पना तुझी. फेकल्यावर पळून न जाता तिथंच थांबून अटक करवून घेण्याची कल्पना तुझीच.

भगत : मी आजही तेच म्हणतोय. देशविदेशातील पत्रकार असणार तिथं, आपली भूमिका जगासमोर मांडण्यासाठी एचएसआरएकडे याहून चांगली संधी नसेल.

सुखदेव : (चिडून) आणि ती भूमिका मांडणार कोण ? राजगुरू? ऑर्गनायजेशनचा सगळ्यात विश्वासू माणूस, पण त्याला बोलायला सांगितलं तर मुद्दा सोडून बाकी दुनियाभरचं सगळं बोलेल. का तुझ्या एका इशाऱ्यावर जीव लावायला तयार होतो तो जयगोपाल? ज्याला पुढे येऊन बोल म्हटलं गडी तोंडातून एक शब्द काढत नाही.

भगत : पण हे सगळं मला सांगण्यात काय अर्थ आहे?

सुखदेव : (उपहासाने हसत) कमाल झाली म्हणायची, सरदार भगत सिंह सुखदेवच्या एका छोट्याशा प्रश्नाचा अर्थ विचारता आहेत?

भगत : जे काही असेल ते स्पष्ट बोल सुखदेव.

सुखदेव : सरदार भगतसिंहांना अचानक अशी जाणीव झाली आहे , की त्यांचं महान इंटलेक्ट फक्त लिहिण्याच्या कामाचं आहे . एच.एस.आर.ए.चा थिंक टॅंक समजल्या जाणाऱ्या सरदार भगतसिंहांच्या विचाराचं गलबत डगमगायला लागलं की काय? संघर्षासाठी द्याव्या लागणाऱ्या आपल्या आयुष्याला सरदार भगतसिंह काही कोमल हळव्या क्षणांसाठी राखून ठेवायचं म्हणता आहेत.

भगत : (शांतपणे) सुखदेव, तोंड सांभाळ.

सुखदेव : कोणत्याही क्रांतीमध्ये कसलंही कन्फ्युजन असू नये, मित्रा. क्रांती म्हणे! लग्नाची क्रांती करायला निघालेत.

भगत : शेवटचं सांगतोय सुखदेव, तोंड सांभाळ.

सुखदेव : तू काय सांगतोस मला? तुझे बदललेले डोळे पाहिलेत मी. तुला स्वतःला नवीन काही करता येणार नसेल तर तुझ्या आधीच्या पिढीला थप्पड मारायचा तुला काहीच अधिकार नाही..

भगत : (ओरडतो) पंडितजी.

[संगीत सुरु, गायकाचा प्रवेश]

आज तो हो जाये जो होता है और होता जाएगा
उसको रोकेगा कौन भला तुम बोलो..
उसे तो होना है और हुआ करेगा होने में उसकी होनी है
नहीं हुआ तो किधर मरेगा बोलो..
लेकिन हुआ करे तो होने दो उसको ना रोको वो तो होकर
ही कुछ कर दिखलाएगा अरे बोलो..
आज जो होता है सो होने दो अब देखें कितना हो सकता है यही नाप लें
फ़ितरत अपनी बोलो ..
आज तो हो जाए...आज तो हो जाए.

[गाण्याच्या शेवटच्या ओळींसोबत संगीत वाढत जातंय , भगत आणि दत्त पडद्यावरील सावलीतून, हात उंचावतात, आणि बॉम्ब फेकतात, भगत स्टेजवर येतो]

भगत : The british empire was established by fraud and forgery of Clive and Hastings and it is being maintained by british bayonets. And henceforth we say in the loud roaring voice that 'Down with Imperialism, Workers of the World Unite. Long Live Revolution.)

दोघे : लॉन्ग लिव्ह रिव्होल्यूशन, इन्कलाब जिंदाबाद.
लॉन्ग लिव्ह रिव्होल्यूशन, इन्कलाब जिंदाबाद.
लॉन्ग लिव्ह रिव्होल्यूशन, इन्कलाब जिंदाबाद.

(पडदा)

अंक पहिला समाप्त

## अंक दुसरा

[आधीच्या दृश्यापासून पुढे सुरु. पडदा उघडताना मागे' इन्कलाब जिंदाबाद' या घोषणांचे आवाज, सगळी पात्रं भगत सोबत नारे देतात, मार्कंड आणि दत्त त्यांच्या जागेवर येतात, भगत त्याच्या जागेवर]

**(दृश्य १)**

(मोंताज)

मार्कंड : आणि मग त्यानंतर जेलमध्ये भगतसाठी एक पत्र आलं.

दत्त : त्याच्या वडिलांचं. त्यांनी त्याच्या बचावासाठी अर्ज केला हे कळल्यावर तो उद्विग्न झाला.

मार्कंड : त्यावर त्याचं काय म्हणणं होतं?

भगत : आदरणीय पिताजी,

माझ्या बचावासाठी आपण अर्ज पाठवला हे ऐकूनच मला त्रास झाला. सध्याच्या परिस्थितीमध्ये अशा प्रकारचा अर्ज करणे हे तुम्हाला कसे काय योग्य वाटते, हे काही मला समजू शकत नाही.

.. एक पिता म्हणून आपली भावना आणि आपली कळकळ लक्षात घेतली, तरी माझ्याशी सल्लामसलत न करता माझ्यावतीने असे पाऊल टाकायचा आपल्याला कोणताही हक्क नाही, असे मला वाटते. राजकीय क्षेत्राबाबत माझे विचार हे आपल्यापेक्षा नेहमीच वेगळे राहिले आहेत, हे आपणास ठाऊक आहे. मी आपल्या मान्यतेचा किंवा अमान्यतेचा विचार न करता नेहमीच स्वतंत्रपणे काम करत आलो आहे.

.. आपण उचलेल्या या पावलाबद्दल आपल्यावर दोषारोप करताना किंवा टीका करताना मी सभ्यतेच्या सीमा तर उल्लंघत नाही ना, आणि माझी भाषा अधिक बोचरी तर बनणार नाही ना, अशी धास्ती मला वाटते. पण माझे म्हणणे मी

स्पष्टपणे अवश्य सांगेन. जर दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने माझ्याशी असा व्यवहार केला असता, तर त्याला मी विश्वासघातापेक्षा कमी लेखले नसते . पण आपल्याबाबत मी एवढेच म्हणेन, की हा एक दुबळेपणा आहे.

.. या विषयासंबंधीच्या गुंतागुंतीचे सर्व सत्य जनतेला समजले पाहिजे , अशी माझी इच्छा आहे, म्हणून हे पत्र प्रसिद्ध करावे , अशी मी आपणास विनंती करतो.

आपला प्रिय,

भगत.

(स्पॉट)

किशन सिंह : (थकलेल्या स्वरात) या म्हाताऱ्या बापानं अजून काय करायचं होतं आपल्या पोरासाठी? सगळं जेल बघत होतं, सगळ्यांसमोर नको म्हणाला, माझी केस मीच लढेन म्हणाला.

विद्यावती : त्याचा काय फायदा?

किशन सिंह : या लोकांचं फायदा नुकसानीचं गणित मला कधी कळलंच नाही.

(स्पॉट)

भगवती : (ओरडून) एक तार लाहोरला पाठवली त्याच्या घरी, बाकी सेंटरवर. पंडितजी, सरकार हात धुवून मागं लागलं आहे. सगळीकडे छापे पडत आहेत. सगळ्यांना अंडरग्राउंड व्हायच्या सूचना द्याव्या लागतील.

आजादः ते ठीक आहे, पण ऑर्गनायजेशनचं कामदेखील चालू राहिलं पाहिजे. राजगुरू तू आत्ता ताबडतोब पुण्यासाठी नीघ . आणि ऐक, तुझ्या या कात्रीसारख्या चालणाऱ्या तोंडावर लगाम घाल. पाटणा, आग्रा, झाशी, सहारनपूर सगळीकडे तार करा- गायब व्हा - म्हणून. लाहोरमध्ये सुखदेवला अतिशय सावध रहायला सांगा, पोलीस कुत्र्यासारखे मागे लागलेत त्याच्या. चला निघा सगळे.

(स्पॉट)

मार्कंड : अरे, पण तुमच्या त्या धमाकेदार योजनेचं काय झालं ? कुठं गेलं तुमचं ते एच.एस.आर.ए चं प्रचंड नेटवर्क, तुमच्या पंडितजींच्या मार्गदर्शनाचं काय झालं? प्रत्येक गोष्टीमधले सर्वज्ञ होतात ना तुम्ही?

(स्पॉट)

आजाद : (चिडून) काय?

भगवती : होय पंडितजी, जयगोपाल फितूर झाला. सरकारनं त्याला माफीचा साक्षीदार केला. लाहोरमधल्या बॉम्ब फॅक्टरीवर छापा पडला . आणि आज आग्र्यामध्ये फॅक्टरीसोबत..

आजाद : फॅक्टरी सोबत?

(स्पॉट)

किशन सिंह : (थकलेल्या आवाजात) कसाही असला तरी मला माझ्या पोरासारखा होता तो.

विद्यावती : आता त्याचं काय होणार?

किशन सिंह : व्हायचंय काय? परवा रात्री आला होता भेटायला , पाया पडून विचारलं, भगतसाठी काही निरोप आहे का . आता काय, निरोप घेऊन स्वतःच गेला त्याच्याकडं.

(स्पॉट)

सुखदेव : सगळ्यांची आठवण येत होती. त्यातच ही संधी चालून आली. भगत, मी काही फार मागं नाही. तू दिल्लीत आहेस आणि मी लाहोरमध्ये . जेलचाच काय तो फरक. तुझी केस सुरु होणार असं ऐकलं मी?

(स्पॉट)

भगत : माणसावर प्रेम करण्यात आम्ही तसूभरही कमी नाही, म्हणूनच माणसाची हत्या करण्याची इच्छा होण्याचा प्रश्नच उदभवत नाही . आक्रमण करण्याच्या हेतूनं जेव्हा बळाचा वापर केला जातो , तेव्हा त्याला हिंसा म्हणतात आणि नैतिक दृष्टिकोनातून त्याचे समर्थन करता येत नाही . परंतु, जेव्हा एखादया उचित आदर्शासाठी त्याचा वापर केला जातो तेव्हा नैतिकदृष्ट्याही ते उचित असतं. गुरु गोविंद सिंह, छ. शिवाजी, केमाल पाशा, रजा खान, वॉशिंग्टन, गॅरिबाल्डी, लाफायेत आणि लेनिन यांच्या आदर्शांपासून स्फूर्ती घेऊन आणि त्यांच्या पाऊल खुणांवर पाय ठेवूनच भारतात उसळणारं हे नवं आंदोलन निर्माण होत आहे आणि ही त्याची पूर्वसूचना होती.

दत्त : मनुष्य हत्या हेच ज्यांचे काम असते त्या साम्राज्यशाहीच्या भाडोत्री सैनिकांसारखे आम्ही नाही. आम्ही मानवी जीवनाची कदर करतो आणि त्याचे रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. असं असूनही आम्ही हे मान्य करतो , की आम्ही जाणूनबुजून असेम्ब्लीत बॉम्ब फेकले.

भगत : कारण बहिऱ्यांना ऐकवण्यासाठी खूप मोठ्या धमाक्याची गरज असते.

दत्त : आमच्या या कृत्याबद्दल शिक्षा भोगण्यासाठी आम्ही जाणूनबुजून स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन केले. साम्राज्यवादी शोषकांना आम्ही हे सांगू इच्छितो , की मूठभर लोकांना मारून कोणतेही उदात्त आदर्श गाडून टाकता येत नाहीत . आमच्यासाठी क्रांती म्हणजे केवळ बॉम्ब आणि पिस्तुल यांचा पंथ नव्हे तर अन्यायावर आधारलेल्या प्रचलित समाज व्यवस्थेत अमूलाग्र बदल. क्रांती हा मानवजातीचा जन्मजात अधिकार आहे, जो हिरावून घेतला जाऊ शकत नाही.

भगत : जुनाट व्यवस्था सदैव टिकून राहू शकत नाही. तिनं नव्या व्यवस्थेसाठी जागा रिकामी करत राहणं, हे आवश्यकच आहे. जर आज सर्वहारा वर्गाला महत्त्व नाही दिलं गेलं तर , उद्याचा हिंदुस्थान केवळ काही मोजक्याच भांडवलदार वर्गासाठीचा सुवर्णकाळ ठरेल. आम्ही ‘इन्कलाब जिंदाबाद’ ची घोषणा जेव्हा

बुलंद करत असतो, तेव्हा आमच्या हृदयात हा आशय भरलेला असतो.

दोघे : इन्कलाब जिंदाबाद... इन्कलाब जिंदाबाद... इन्कलाब जिंदाबाद

(स्पॉट)

मार्कंड : (हसतो) काय झालं त्या महान भाषणाचं? कोणाला तरी आठवतंय का ते? आज १९६५ हे साल याला साक्ष देऊ शकतं, की स्वातंत्र्य आम्हाला काँग्रेसनं मिळवून दिलं. तुमची मुव्हमेंट तर एक तात्पुरता बुडबुडा होता. काळाच्या ओघात केव्हाच फुटून गेला आणि जाताना सोबत घेऊन गेला तुमची पिस्तुलं , गोळ्या आणि धमाक्यांचे आवाज.

दत्त : चुकतोयस, मार्कंड. १९४७ मध्ये धमाक्यांचे आवाज महाभयंकर ऐकू आले होते आणि त्यासोबत त्या करोडो लोकांचे आवाज जे काळीज पिळवटून म्हणत होते नकोय आम्हाला पाकिस्तान, नकोय आम्हाला हिंदुस्थान. आम्हाला अशी जागा हवी जिथं आम्ही मोकळेपणानं स्वातंत्र्याचा श्वास घेऊ शकू . दोन्ही देशात आजही तो लाव्हा पेटलेलाच आहे. कोणाला जबाबदार ठरवशील यासाठी?

(स्पॉट)

किशन सिंह : (उपहासाने हसतो) पॉलिटिकल किलर्स.

विद्यावती : म्हणजे काय?

किशन सिंह : म्हणजे राजकीय खुनी. राजकारण टिकून ठेवण्यासाठी जे कोणाचाही खून करू शकतात असे लोक.

विद्यावती : पण असं वागून यांना नेमकं कसलं राजकरण करायचं असतं?

किशन सिंह : खोटेपणाचं..

(स्पॉट)

भगवती : नाही. मी खोटं नाही बोलत. पंडितजींना निरोप पोहोचवा, की काल शिव वर्मा, जयदेव कपूर, सुरेंद्र पांडे, विजय, महावीर सिंग आणि कुंदनलाल सहारनपूरमध्ये पकडले गेले. मी आज इथून निघतो आहे. स्वतःची काळजी घ्या, कारण उद्या भगत आणि दत्तचा कोर्टात निर्णय आहे.

[मंचामागून विद्यावतीचा आवाज : (रडत) आपल्या भगतला...]

(स्पॉट)

किशन सिंह : (थकलेल्या आवाजात) वाहे गुरुंना हेच मंजूर असावं कदाचित, जन्मठेप. तरी मी म्हणतो थोडक्यातच निभावलं. या हरामखोर सरकारकडून त्याचीही अपेक्षा नव्हती. तो जिंवत राहील यातच काय तो आनंद.

विद्यावती : जसा अजितच्या जिवंत असल्याचा आनंद..

किशन सिंह : काका आणि भाचा दोघे एकत्र परततील बघशील तू . आणि ज्या दिवशी परततील त्या दिवशी या घरात असा आनंद साजरा केला जाईल , की सगळं लाहोर बघत राहील.

(अंधार)

**(दृश्य २)**

[मंचावर नवीन भाग, भगत आणि सुखदेव सोबत जतींद्रनाथ दास एका स्पॉटमध्ये]

भगत : माझं नाव भगत सिंह.

सुखदेव : माझं नाव सुखदेव.

जतींद्र : माझं नाव जतींद्रनाथ दास. आग्रा फॅक्टरीमध्ये बॉम्बसाठी मसाला तयार करत

होतो तेवढ्यात मागून हॅन्ड्सअप असा आवाज आला. एकदा विचार आला असाच मागच्या मागे बॉम्ब फेकावा, पण मग विचार केला तुम्हा येड्या पोरानां परत कधी भेटणार. असाही मी तुमचा बापच म्हणायला हवा , तुम्हाला बॉम्ब तयार करायला शिकवलं मीच.

भगत : (हसून) अरे, आपण जगाचे बाप आहोत. आपल्याला कोण काय सांगणार? पण आपल्याला आपले पाय जमिनीवर ठेवले पाहिजेत . लोक तेव्हाच आपलं ऐकतील जेव्हा आपण आपल्या भावनांवर विजय मिळवून क्रांतीच्या मार्गावरून चालून दाखवू. (अचानक वळतो) जतींद्र, आठवतं का तुला?

जतींद्र : (हसतो) न आठवायला काय झालं. बाजारात एक कॅलेंडर आलं होतं ज्यावर ती सुंदरी होती. राजगुरूला ते इतकं आवडलं की त्यानं ते विकत आणून पार्टी ऑफिसमध्ये लावलं. ज्यादिवशी पंडितला कळलं त्यादिवशी कसला भडकला होता. त्यानी तर फाडून फेकून दिलं ते. राजगुरूला हे कळल्यावर तो गेला की जाब विचारायला, ‘कोणी फाडलं माझं कॅलेंडर’ पंडित म्हणाला , ‘मी’. हा म्हणाला ‘का फाडलंस?’. पंडित म्हणाला, ‘एकतर क्रांती कर नाहीतर हे असलं काहीतरी’. राजगुरूचा आवाज एकदम नरम झाला, म्हणाला ‘सगळ्या सुंदर गोष्टी नष्ट करणार का जगातल्या?’ पंडित म्हणाला, ‘हो, करणार’. हा म्हणाला, ‘हो का, मग उद्या ताजमहाल पण पाडशील’, पंडितजी म्हणाले, ‘हो, क्रांतीच्या आड येणार असेल तर पाडून टाकीन,’ बरं, इतकं झाल्यावर गप्प बसेल तो राजगुरू कसला, नंतर म्हणाला, ‘सुंदर गोष्टी नष्ट करून सुंदर जग निर्माण करायला निघालेत, हे नाही होऊ शकणार.’

भगतः तो खरंच एक सुंदर प्रश्न होता. तुला तो इटलीचा क्रांतिकारक आठवतो का , मॅझिनी? आपल्या पहिल्या असफल विद्रोहानंतर पूर्णपणे निराश झाला होता . आपल्या गमावलेल्या साथीदारांची आठवण काढून सतत रडत राहायचा . कदाचित तो वेडा झाला असता आणि त्यानं आत्महत्याच केली असती . पण प्रेयसीच्या एका पत्रानं त्याला इतकी ताकद दिली , की तो आधीपेक्षाही कणखर बनला. हो, मी विचारलं होतं त्या मुलीविषयी . मी विचारलं कारण मला तिची आठवण येते. कोणाला तरी आठवणं हा हक्क आहे माझा . कोणाला तरी माझ्या

आठवणीत साठवणं हा हक्क आहे माझा . सुखदेव आपण सध्या एका गुलाम देशाचे नागरिक आहोत आणि अशावेळी प्रेमासारख्या सुंदर गोष्टीसाठी चांगलं वातावरण नाही आहे, हे असं जर नसतं ना तर , खरंच मी माझ्या प्रेयसीच्या मिठीत तिच्या खांद्यावर डोकं ठेऊन बसलो असतो.

(गायकाची प्रवेश. कोरस सुरु.)

वतन की आबरू का पास देखे कौन करता है
सुना है आज मक़तल में हमारा इम्तिहा होगा
इलाही वो भी दिन होगा जब अपन राज देखेंगे
जब अपनी ही जमी होगी और अपना आसमां होगा
इलाही आज गोरी की तबियत फीकी-फीकी है
इलाही आज उसकी भी ज़रूरत तीखी-तीखी है
इलाही बिस्तरों की सलातो का हाल रूठा है
इलाही घुंगरुओं की धड़कनों का ताल टूटा है
इलाही आएगा वो दिन जो गोरी बिच में होगी
और उसको घेर कर चलता थिरकत कारवाँ होगा..
वतन की आबरू का ...

**(दृश्य ३)**

[घराचा परिसर]

विद्यावतीः ते ठीक आहे. (मुलगी शांत उभी आहे.) शिक्षा मिळाली, पण ती नाही ज्याची भीती होती. वाहेगुरूंची कृपाच म्हणायची. आलाय इकडेच, लाहोरमध्ये आहे. आजच आलंय त्याचं पत्र जेलमधून . त्यातसुद्धा सुखदेवने तुला नमस्कार सांगितला आहे, आगाऊ कुठला. (हसून बोलते) काळजी करू नका इकडे भगत खूप रसगुल्ले खातोय असं लिहिलंय. मी त्याला कणसं खायला घालतोच आहे. इतका खातो म्हणून सांगू, चांगलाच फुगलाय नुसतं खाऊन खाऊन. आणि नंतर लिहिलंय, की जेलमधून बाहेर आल्यावर महंतांकडे जाऊन भूत उतरवू (हसते.) हे महंतांचं काय आता नवीन? मला तर काही कळतच नाही यांचं. बरं, मी तुला

काय सांगायला आले होते, की तू नीट रहा, खाण्यापिण्याची कसली आबाळ करू नको. छान कपडे घाल. इतकंस तर आयुष्य असतं आपलं. उद्या कोणी बघितलाय? आपण आजचा विचार करून जगावं हेच खरं. मी निघते आता. ह्या भगतचे अजून काही मित्र आलेत घरी , त्यांच्या जेवणाचं बघायचं आहे . (आवाज पाणावतो) ही पोरं पण काय वेडी आहेत.

मुलगी : बेबेजी.. (विद्यावती थांबते) मला काही फार लिहायला वाचायला येत नाही . अनुभवपण कमीच आहे माझा. मला फक्त इतकं माहीत आहे, की त्याला पकडलं आणि त्याला शिक्षा झाली. त्याचा दोष काय होता? त्यानं काय केलं होतं? हे देखील मला माहीत नाही. आणि मला माहीत करूनही घ्यायचं नाही. मला फक्त इतकंच माहिती आहे, की त्याला शिक्षा व्हायला नको होती . का? कारण माझं मन सांगतंय म्हणून. माझं मन मला हे पण सांगतंय, की कोणीतरी यावं. पण कोणी येत नाही.. पण याच्यात मला त्यांचा काहीच दोष वाटत नाही. का? कारण माझं मन सांगतंय म्हणून. पण मीदेखील हार नाही मानणार. जर न येणं कोणाचा स्वभाव असेल तर त्याच्या येण्याची वाट बघणं माझा स्वभाव आहे. मी त्याच्या स्वभावाच्या आड येणार नाही आणि त्याने माझ्या येऊ नये . बाकी तुम्ही कसली काळजी करू नका. चांगलं खाणंपिणं आणि छान रंगीत कपडे घालणं हा आता माझा स्वभाव झालाय कारण उदास राहून कोणी प्रेमाची वाट बघू नाही शकत.

**(दृश्य ४)**

(मोंताज)

खान बहादूर : (हातात हंटर.. ओरडतोय) कसली वाट बघताय साल्यांनो, वरून कोणी पैगंबर येईल आणि तुम्हाला सोडवून घेऊन जाईल? हे लाहोर सेंट्रल जेल आहे.. दिल्ली, कानपूर नाही.

(अजून एक स्पॉट. यतींद्रला पाच पठाणांनी पकडलंय) घट्ट पकड साल्याला... हरामखोर, इंग्रज ऑफिसर्सना मारणार काय? सरकारशी पंगा? नाकात नळी

घुसवा आणि ढकला सगळं अन्न पोटात . बघू कसा खात नाही ते . उपोषण करतायत साले हरामी, कसं चालू ठेवता उपोषण तेच बघतो मी . माझं नाव माहीत आहे ना..?

(स्पॉट)

भगवती : (ओरडून) खान बहादूर अब्दुल अजीज. पंडितजी, तो जेलर महाभयंकर आहे. आपल्या पोरांनी खायला नकार दिल्यावर त्यांच्या छातीवर बसून नाकातून अन्न घुसवायचा प्रयत्न सुरु आहे . असल्या अमानवी सक्तीनंतर अनेकजण बेशुद्ध होऊन पडलेत, कोणी घसा उघडलाच जाऊ नये म्हणून मिरचीचा बुक्का खात आहेत, तर कोणी आपल्या तोंडात कापडाचे बोळे चावून धरत आहे . आज त्यांच्या उपोषणाचा पन्नासावा दिवस होता. पंडितजी, त्या हरामी जेलरने अजून पंचवीस पठाण मागवलेत.

(स्पॉट)

भगत : (त्वेषाने) हे उपोषण थांबणार नाही. हे युद्ध थांबणार नाही. आता कुठं लढाईला सुरुवात झाली आहे. वुई आर पॉलिटिकल प्रिझनर्स. वुई वॉन्ट द फॅसिलिटीज इक्विवॅलंट टू युरोपिअन प्रिझनर्स.

(स्पॉट)

सुखदेव : (ओरडतो) शिऽऽव. नको..यार.. या शिवने झुरळ पकडून खाल्लं, पोटात होतं नव्हतं ते बाहेर आलंय आणि त्या अजयने आमटीचा तिखट कट पिला वाडगाभर, हा असा सुजलाय गळा... नळी जायला जागा नाही आहे ... आणि जतींद्र.. हरामी साले.. त्याला आडवा पाडून नाकातल्या नळीतून इतकं दूध ओतलंय, की शेरभर दूध त्याच्या फुफ्फुसात गेलंय. पूर्ण आखडून गेलाय तो.

(स्पॉट)

जयदेव : (ओरडून) औषधदेखील पोटात नाही जाऊ देणार म्हणतोय जतींद्र.. आमच्या मागण्यांचं काय झालं इतकंच बोलतोय सारखं..

जतींद्र : हम तो निकले ही थे घर से बाँधकर सर पे कफ़न,
जाँ हथेली पर लिये लो बढ चले हैं ये कदम।
जिन्दगी तो अपनी महमाँ मौत की महफ़िल में है,
सरफ़रोशी की तमन्ना अब हमारे दिल में है।
यूँ खड़ा मकतल में कातिल कह रहा है बार-बार,
"क्या तमन्ना-ए-शहादत भी किसी के दिल में है?"
सरफ़रोशी की तमन्ना अब हमारे दिल में है,
देखना है ज़ोर कितना बाज़ु-ए-कातिल में है?

(स्पॉट)

शिव वर्मा : (ओरडून) त्याची नाडी लागेना झाली आहे, जतींद्र.... जतींद्र उठ.. डोळे उघड.. डोळे उघड.

(स्पॉट)

सुखदेव : (मोठ्याने) एक क्षणदेखील स्वतःला असं वाटू देऊ नका, की एक जतींद्रनाथ दास मारून तुम्ही या स्वातंत्र्य संग्रामाच्या वादळाला थोपवू शकाल . आम्ही प्रत्येकजण असेच या आगीतून चालत राहू, जो पावेतो आम्ही आमच्या उद्दिष्टापर्यंत पोहोचत नाही.

(स्पॉट)

[दत्त आणि मार्कंड]

दत्त : दासच्या हौतात्म्या निमित्त केंद्रीय असेम्ब्लीमध्ये कामकाज थांबवण्याचा प्रस्ताव मांडताना पंडित मोतीलाल नेहरू यांनी म्हटलं, '.. अशा मामल्यामध्ये ज्या मानवी मूल्यांवर आधारलेला सरकारचा कारभार असला पाहिजे त्याचा पूर्ण अभाव दाखवला गेला आहे, योग्य ती पावलं न उचलता सरकार हात बांधून बसलं होतं. ब्रिटिश सरकारच्या या अत्याचाराचा मी धिक्कार करतो.'

या प्रस्तावाला पाठिंबा देताना पंडित मदन मोहन मालवीय म्हणाले , '.. हे सर्वसामान्य अपराधी नाहीत. त्यांनी कोणत्याही वाईट किंवा व्यक्तिगत स्वार्थाच्या भावनेने प्रेरित होऊन कोणतीही कृती केलेली नाही . ते सर्वजण देशभक्तीच्या उच्च भावनेने प्रेरित झालेले लोक आहेत'.

या प्रस्तावाला समर्थन देत बंगालच्या अमरनाथ दत्तबाबूंनी आपल्या भाषणाचा शेवट रवींद्रनाथ टागोरांच्या एका वाक्याने केला. ' बोझा तोर भारी होवे, डुबिबे तोरी खाना, तोर ध्वजा धुले लुठाइबे' अर्थात, तुझ्या पापांचा बोजा वाढेल, तुझी नाव बुडेल आणि तुझं निशाण धुळीला मिळेल. गणेश शंकर विद्यार्थी म्हणाले, 'आय स्पिट ऑन दि करेज ऑफ ब्रिटीश एम्पायर. यु डोंट इवन नो हाऊ टू किल'.

भगत : (गर्जना करत) Don't you forget that the soil of this nation has had enough from you, the britishers! Now it needs something from us and we are out and out prepared to give the most precious thing we have that is ... Our lives. And now we demand Complete Independence.

(स्पॉट)

किशन सिंह : (गहिवरून) काल जतींद्र गेला, भगतच्या साथीदारांमधला पहिला शहीद.

(स्पॉट)

आजाद : (गहिवरल्या आवाजात) तुम्हा लोकांना असं कायमचं गमावता यावं म्हणून तयार केलं होतं का मी?... तुम्हाला तयार करून मरणाच्या दाढेत ढकलायचं एवढंच काम आहे का माझं सेनापती म्हणून?

(स्पॉट)

भगत : पंडितजी. याला गमावणं नाही म्हणत.. याला कमावणं म्हणतात, अगदी

संपूर्णपणे.

शिव वर्मा : आता आमच्या सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय हे उपोषण थांबणार नाही.

(अंधार)

**(दृश्य ५)**

किशन सिंह : (नाचत) सरकारला वाकावं लागलंच, आपल्या पोरांच्या मागण्या मान्य झाल्या. (विद्यावतीचा हात हातात घेऊन नाचात ओढून घेतो)

विद्यावती : अहो, काय करताय? लोकं बघतायत.

किशन सिंह : आज सगळ्या गावाला जेवू घालणार आहे मी. साऱ्या लाहोरला लस्सी वाटणार. आजचं आहे आपली बैसाखी.
(सगळे नाचू लागतात, दत्त आपल्या स्पॉटमध्ये उभारून हसत आहेत.)
(अंधार)

**(दृश्य ६)**

सुखदेवः (नम्रपणे) जमलेल्या तमाम भारतीय बंधूनो आणि भगिनींनो..
(आवाजः अरे भगिनी नाहीत इथं.) (सुखदेव कान पकडतो आणि पुन्हा बोलू लागतो.)
मी माझा एक शब्द मागे घेतो आहे . जमलेल्या तमाम भारतीय बंधूनो, आपलं ११४ दिवस चाललेलं उपोषण संपून दोनेक आठवडे झाले. पण असं जरी असलं तरी आपलं उपोषण खऱ्या अर्थानं संपलं असं आम्हाला वाटतं नव्हतं . ही खंत आम्ही आमच्या प्रिय मित्र जयदेवला पत्रातून बोलून दाखवली . त्याचं त्यानं पाठवलेलं सुंदर उत्तर आज आम्हाला मिळाले . तर तुमचा अधिक वेळ न दवडता त्या उत्तराकडे जात आपण खऱ्या अर्थाने उपोषणाची सांगता करणार आहोत... (ओरडतो) चांगभलं.. (सगळे ओरडतात चांगभलं)

मार्कंड : (थकलेला स्वर) चांगभलं.. यांच्या चांगभलंनी ब्रिटिश साम्राज्याला हादरवून सोडलं.. खरंच.

दत्त : आणि मग त्यानंतर जपान, कॅनडा, पोलंड, दक्षिण अमेरिका सगळीकडून समर्थनाची शेकडो पत्रं आली. इथे भारतात हजारो लोक आंदोलन करू लागले. जागोजागी संप होऊ लागले. इथला शेतकरी आणि कामगार रस्त्यावर आला. वृत्तपत्रं सरकारच्या विरोधात लिहू लागली. आमच्या विचारांना लोकांनी मान्य केलं होतं, आम्ही सगळे आनंदात होतो, भावुक होत होतो. त्यात आमचा शिव अतिशय हळवा माणूस, तो एक दिवस म्हणाला भगतला.

(स्पॉट)

शिव वर्मा : यार भगत, आजकाल तुला नावाने हाक नाही मारावीशी वाटत.

भगत : मग कशी हाक मारणार?

शिव वर्मा : सरदार.

दत्त : आणि सरदार भगतसिंह संधूची 'कंप्लिट इंडिपेंडन्स' ही घोषणा देशात सर्वत्र घुमू लागली. ज्या घोषणेला स्वतः गांधीजींनी एक वर्षापूर्वीच्या कलकत्ता अधिवेशनात नाकारलं होतं त्यांनाही या घटनेच्या दोन महिन्यानंतर त्या घोषणेला लाहोर अधिवेशनात स्वीकारावंच लागलं. कारण स्वीकारण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता.

शिव वर्मा : सरदार! इतिहासात या घोषणेचं श्रेय काँग्रेसला दिलं जाईल याची कल्पना आहे ना तुला?

भगत : (हसून) काल मी आपल्या हवालदाराच्या आठ वर्षाच्या पोराला ही घोषणा देताना पाहिलं, तेव्हा माझं श्रेय मला मिळालं.

शिव वर्मा : एक गोष्ट विचारू सरदार? गांधीजींना कधी भेटला आहेस का?

(स्पॉट)

विद्यावती : एकच आठवण आहे. तेव्हा भगत आठ वर्षाचा होता. गांधीजी लाहोरला त्याच्या शाळेत आले होते. खूप गर्दी होती. सगळं वातावरण गांधीमय झालं होतं. लहान मुलं त्यांना उड्या मारून मारून बघायचा प्रयत्न करते होते. गांधीजी रस्त्यावरून जाताना एकदम भगतच्या समोर आले, भगत जोराने म्हणाला, सतश्री अकाल. ते थांबले, भगतकडे पाहिलं.. आणि मग छान हसले, त्याच्या डोक्यावर हात ठेऊन म्हणाले..

भगत : सतश्री अकाल सोबत वंदे मातरम् पण म्हणत जा. आपल्या देशाला त्याचीसुद्धा गरज आहे.

विद्यावती : तेव्हा मी त्याच्या सोबतच होते . नंतर कितीतरी वेळ भगत त्यांच्या जाणाऱ्या वाटेकडे डोळे भरून बघत बसला होता.

भगत : मी त्यांचा भक्त कधीच नव्हतो , पण मी त्यांचा अनादरही कधी केला नाही . त्यांनी चालवलेल्या असहकार आंदोलनानं अफाट जागृती केली . स्वातंत्र्य लढ्यातील त्यांची भूमिका पाहता त्यांना सलाम न करणं हे नक्कीच कृतघ्नपणाचं ठरेल. गांधीजी थोर जननायक आहेत, मी त्यांचा पूर्ण आदर करतो आणि म्हणूनच त्यांच्यावर वैचारिक टीका करण्याचा मला पूर्ण हक्क आहे . अहिंसा हा नक्कीच महान आदर्श आहे. पण माझ्यासाठी ती भविष्यातली गोष्ट आहे . एक गोष्ट नक्की, आम्हाला भविष्यातला हिंदुस्थान हा मागे बघणारा नको आहे . जिथे असमानता आहे, गरिबी आहे, अस्पृश्यता आहे, जिथे लांडग्यांचं राज्य आहे . आम्हाला हवा आहे असा समाज जिथे तरंग असतील , जिथे उमेद असेल, आनंदाने बागडणारी मुलं असतील , जिथं जगणं तर सुंदर असेलच पण त्याचबरोबर एकमेकांची आयुष्यं सुंदर करणारी माणसंही असतील . आमचा इन्कलाब रक्तपिपासू नाही उलट आम्ही त्याला तर फुलाच्या नाजूक

पाकळ्यांप्रमाणं प्रेमानं घडवला आहे. इन्कलाब नक्कीच येणार याची मला खात्री आहे. तो आम्ही आमच्या जिवंतपणी पाहू शकणार आहोत की नाही ही बाब अलाहिदा.

(गायकचा प्रवेश आणि गाणं)

इलाही ये तो सिर ये कर्ज़ है देना ही देना है ही
इलाही ये तो अटकी नाव है खेना ही खेना है
इलाही ये तो अटकी फाँस है तो दर्द देती है
इलाही खींच कर इसको कभी तो फ़ेंक देना है
इलाही आज ये हैं घोंसला नन्हे से चूजों का
कभी तो ये हरेक चूजा उबलता नौजवां होगा
वतन की आबरू का पास देखें कौन करता है
सुना है आज मक़तल में हमारा इम्तिहा होगा
इलाही वो भी दिन होगा जब अपना राज देखेंगे
जब अपनी ही जमी होगी और अपना आसमां होगा

[गाणं संपतं, अंधार]

**(दृश्य ७)**

[भगत आणि राजगुरू दिसता आहेत, बाकी अंधारात]

भगत : (गंभीरपणे) नाव?

राजगुरू : शिवराम हरी राजगुरू.

भगत : आरोप?

राजगुरू : सॉण्डर्स मर्डर

सुखदेव : कधी पकडला गेलास?

राजगुरू : १० जानेवारी १९३०

भगत : कुठं पकडला गेलास?

राजगुरू : पुण्यात.

शिव वर्मा : कसा पकडला गेलास?

राजगुरू : माहीत नाही. जेव्हा पकडलं तेव्हा कळलं, की पकडलो गेलोय म्हणून.

शिव वर्मा : कोणी चुगली केली का तुझी?

राजगुरू : (मान हलवत) हो.

भगत : कोणी?

राजगुरू : मीच.

भगत : म्हणजे?

राजगुरू : पुण्यात एकाला सांगितलं मी सॉण्डर्सला मारलंय म्हणून.

[मंचावर प्रकाश, जेलमध्ये]

सुखदेव : एका माणसाला नाही, निम्म्या पुण्याला सांगितलंस तू. बरं, इथं थांबशील तर ते नाही वर आणि पिस्तूल दाखवून आलास. सांग आता, की मी खोटं बोलतोय म्हणून.

राजगुरू : बिलकुल, खोटं बोलतोयस तू?

सुखदेव : बेट्या, आम्ही जेलमध्ये जरी असलो तरी दुनियेची खबर ठेवतो . पंडितजींचा इशारा विसरलास ना आपल्या कात्रीसारख्या तोंडावर लगाम ठेव म्हणून?

राजगुरू : खूप डास चावत होते. नीट झोपच लागत नव्हती. कदाचित झोपेत बोलून गेलो असेन. (एकदम आवाज बदलून) अरे, व्होट यार? आय हियर अँड दिस बेलकम?

सुखदेव : बाकी कशानं ते माहीत नाही पण तुझं इंग्लिश ऐकून गोरे नक्की पळून जातील.

[सगळे जोराने हसतात . दृश्य बदलू लागतं. कोर्ट. स्पॉट फेडइन . तीन जज आपल्या खुर्चीत येऊन बसतात.]

**(दृश्य ८)**

जे. कोल्ड्स्ट्रीम : Order..Order.. This is May 5, 1930. Hearing to the Lahore Conspiracy Case will start now.

सुखदेव : आपण ही केस इतक्या लवकर सुरु केल्याबद्दल खूप आभारी आहे. आता कुठं फक्त एक वर्ष झालंय अटक होऊन. (सगळे हसतात.)

कोल्ड्स्ट्रीम : Order..Order.. मिस्टर सिंह आणि ग्रुप. तुमच्यावर सुपरिटेन्ड सॉण्डर्सचा बेकायदेशीर हत्याराने खून केल्याचा आरोप आहे. How do you plead, Guilty or Not Guilty?

राजगुरू : तसं नाही जजसाहेब, पण कायदेशीर हत्यारानं मारलं असतं तर आरोप लागला नसता का?

कोल्ड्स्ट्रीम : Behave properly, this is court.

शिव वर्मा : बरं झालं तुम्ही सांगितलंत, इथले मठ्ठ बैल पाहून आम्हाला गोठयात आलोय की काय असं वाटत होतं?

(सगळे हसतात)

सरकारी वकील
कॉर्डन नॉड : जसे की पुरावे सांगत आहेत , असेम्ब्ली बॉम्बस्फोटामध्येदेखील तुमच्या कडून इंग्लिश बनावटीची पिस्तूल मिळाली.

भगत : (हसून) त्यात काय इतकं? ब्रिटीश साम्राज्याकडे हत्यारांची कमी थोडीच आहे. आम्हाला याचंच आश्चर्य वाटतंय, की आमच्या खिशात सरकारला इंग्लिश बनावटीचे रणगाडे नाही सापडले!

कोल्ड्स्ट्रीम : मिस्टर सिंह तुम्ही तुमचं वचन तोडलं आहे . तुम्ही लोकांनी पुन्हा उपोषण सुरु केल्याचं कळलं.

भगत : तुम्ही आमच्या मागण्या मान्य करून त्या लागू केल्या नाहीत. वचन तुम्ही तोडलंत.

कोल्ड्स्ट्रीम : कोणत्याही अटी किंवा मागण्या करण्याच्या स्थितीमध्ये तुम्ही नाही आहात . तुम्ही फार तर रिक्वेस्ट करू शकता.

भगत : (हसत) आणि हे तुमच्यापेक्षा जास्त कोणालाच कळू शकणार नाही , की आज आम्ही तुम्हाला वॉर्निंग देण्याच्या परिस्थितीमध्ये आहोत.

कोल्ड्स्ट्रीम : तुमची पुढची मागणी आहे, की तुम्हाला पुस्तकं, वर्तमानपत्र, लिखाणाचं सामान मिळालं पाहिजे. स्वच्छ कपडे, साफ पाणी वगैरे वगैरे...बस्स इतकंच की अजून काही? तुम्हाला काय वाटतं, तुम्ही हिल स्टेशनवर फिरायला आला आहात?

राजगुरू : आपलं घरदार सोडून आमच्या देशात येऊन आम्हाला लुटून वर आम्हालाच धाक? अरे ब्रिटिश सरकारच्या भाडोत्री कुत्र्यांनो , तुम्हाला काय वाटतं तुम्ही भारत नावाच्या हिल स्टेशनवर फिरायला आला आहात?

(कोर्टात सगळेच हसता आहेत.)

कोल्ड्स्ट्रीम : You will have to follow the rules and regulations of the court Mr. Singh. तुम्हाला बेड्यांमध्येच बसावं लागेल आणि कोर्टाची कारवाई सुरु असताना मध्येच गाणी आता सहन केली जाणार नाहीत.

भगत : बेड्यांचं म्हणाल तर हातही आमचे आहेत आणि इच्छाही . बाकी दहशतवादी आणि राजकीय कैदी यांच्यातला फरक समजून घेण्याची जबाबदारी आपली आहे. राहता राहिलं गाण्याचं .. इथं पेरणीच्यावेळी गाणं म्हटलं जातं , कापणीच्यावेळी गाणं म्हटलं जातं , जात्यावर गाणं म्हटलं जातं , इथं जन्माला आल्यावर गाणं म्हटलं जातं , इथं मेल्यानंतर गाणं म्हटलं जातं , इथं प्रेमासाठी गाणं म्हटलं जातं, इथं सगळ्या सगळ्यांसाठी गाणं म्हटलं जातं .. हा माझा देश आहे. या कधीतरी सोबत! तुम्हालाही शिकवू.

कोल्ड्स्ट्रीम : तुम्हाला काळं का म्हटलं जातं मि. सिंह, तुम्ही तर भुरे आहात?

राजगुरू : (चिडून) तेच म्हणत होतो मी याला, की तुम्हाला गोरं का म्हटलं जातं तुम्ही तर गुलाबी आहात?

कोल्ड्स्ट्रीम : This is enough. ही केस तुमच्याशिवाय चालवली जाऊ शकते याची तुम्हाला माहिती आहे का?

भगत : ऑर्डीनन्स ऑफ द स्पेशल ट्रिब्युनल. व्हॉईसरॉय आयर्विनचा हा रडीचा डाव आम्हाला नक्कीच माहीत आहे. कदाचित इतिहासातली ही पहिलीच वेळ असेल की आरोपी उपस्थित नसताना त्यांच्यावर केस चालवली जाईल.

कोल्ड्स्ट्रीम : आदरणीय व्हॉईसरॉय यांच्याविषयी बोलताना तोंड सांभाळून बोला. मि. गांधी देखील त्यांना सन्मानानं संबोधतात.

भगत : माहीत आहे आम्हाला गांधी-आयर्विन करार. ज्यामध्ये गांधीजींच्या शांततापूर्वक केल्या जाणाऱ्या आंदोलनांना ब्रिटिश सरकरने परवानगी दिली आहे . परवानगी? इंडियन इंडस्ट्री सुरक्षेच्या नावाखाली फक्त बुर्ज्वा वर्गाला फायदे मग ते ब्रिटिश असोत वा भारतीय . ना शेतकऱ्यांवरचा कर कमी झाला , ना नागरिकांवरचा, बाकी राहूदे मिठावरचा टॅक्स देखील काढला नाही.

सुखदेव : सर्व राजकीय कैद्यांना सोडण्यात आलं . पण गदर पार्टीचे अनेक लोक आजदेखील जेलमध्ये सडत आहेत, मार्शल लॉ खाली अटक झालेले अनेकजण जिवंतपणी नरकयातना झेलत आहेत, गांधीजींना कदाचित हे माहीत नसावं. देवगड, काकोरी आणि लाहोर कॉन्स्पिरसी केसमधला एकजण नाही सुटला . वर्षानुवर्षे कलकत्ता, चितगाव, देवळी, बॉम्बे सगळीकडे केसेस सुरु आहेत . हजारो कुटुंबं आपलं कोण ना कोण परत येण्याची वाट बघत आहेत . त्यांना काय उत्तर दिलं या गांधी-आयर्विन करारानं?

(अंधार)

**(दृश्य ९)**

मार्कंड : (थकलेल्या आवाजात) काही नाही. कोणीही काहीच उत्तर देऊ शकलं नव्हतं. तत्कालिन सगळे तथाकथित लीडर्स तोंडाला कुलूप लावून गपचूप बसले होते. त्यांनी कोर्टात येणं बंद केलं होतं. कदाचित सरकारलाही तेच हवं होतं.

म्हातारा शिव वर्मा : आणि अशा वेळी ती इतिहासातली विशेष केस चालवली गेली ज्यामध्ये आरोपींना कोर्टात बोलवायची तसदीदेखील घेतली गेली नाही . (शांत होतात. मार्कंडकडे बघून) मी तुमचं नाव विसरलो?

मार्कंड : मी सांगितलंच नव्हतं.

शिव वर्मा : कानपूरला, मला भेटायला आला आहेस का?

मार्कंड : हो, फक्त बटुकेश्वर दत्ताना भेटायचं होतं म्हणून दिल्लीला गेलो होतो.

शिव वर्मा : ती १९६५ ची गोष्ट झाली . आज १९९४ सुरु आहे. आता आज कोणाला त्या जुन्या आठवणींमध्ये इंटरेस्ट असणार?

मार्कंड : इंटरेस्ट ज्यावेळी घ्यायला हवा होता त्यावेळी घेतला नाही. आता घ्यायचा म्हटलं तरी त्यांच्या सगळ्यांच्यात तुम्ही एकटेच जिवंत उरला आहात. मी फक्त इतकंच सांगायला आलो, की आजच्या परिस्थितीला फक्त आम्ही जबाबदार आहोत, ते नाहीत.

शिव वर्मा : म्हणजे? कशाविषयी बोलतो आहेस?

मार्कंड : मी त्या हजारो लाखो लोकांचा प्रतिनिधी आहे जे त्याच्या वादळी अस्तित्वापासून स्वतःला वाचवू शकले नाहीत. ज्यांनी त्याच्या चेहऱ्याकडे बघून दुसरा भगतसिंह व्हायचं ठरवलं पण..

शिव वर्मा : पण..?

मार्कंड : पण... ते त्याच्या मार्गावर नाही चालू शकले .. काही थकले.. परत गेले, काही भटकले तर काही मध्येच थांबले. पण तो मात्र अर्ध्यातून गायब होऊनदेखील ध्येयापाशी पोहोचलाच. आणि आम्ही इतक्या वर्षांनंतर अजूनही भरकटलो आहे. माझ्याकडं माझं ताम्रपत्र आहे. मी स्वातंत्र्य सैनिक असल्याचं सर्टिफिकेट. आज मी मर्सिडीज मधून आलोय, माझ्या एअर कंडिशन्ड बंगल्यातून. माझी नातवंडं मोठ्या शाळांतून शिकतात. माझी बायको शहरातल्या सर्वात मोठ्या सामाजिक संस्थेची अध्यक्षा आहे.

शिव वर्मा : आता सुविधा मिळत असतील तर त्या वापरायला काय हरकत आहे?

मार्कंड : ही गोष्ट कधी त्याला सांगितली असती?

शिव वर्मा : तो निवडीचा भाग असतो. त्यानं वेगळं काहीतरी निवडलं आणि तुम्ही वेगळं काहीतरी.

मार्कंड : (वेड्यासारखा ओरडत) का?.. का?.. मी ते का नाही निवडू शकलो जे त्याने निवडलं?

(स्पॉट)

भगत : आम्ही हे निवडलं आहे. आम्हाला अभिमान असला पाहिजे आमच्या निवडीचा. आमच्या मुव्हमेंटमुळे येणाऱ्या हिंदुस्थानाला काही दिशा मिळणार असेल तर ते आमचं यश असेल.

मार्कंड : कसलीही दिशा देऊ शकलेला नाहीस तू. आजकाल तुला कॅलेंडरवर पण कोणी छापत नाहीत. कोणालाच तुझी आठवण येत नाही सरदार भगत सिंह.

भगत : लोकांच्या आठवणीत राहणं हे आपलं उद्दिष्ट नाही. उद्या आपला निकाल जाहीर करतील आणि गंमत म्हणजे आपल्याला तो आधीपासूनच माहीत आहे.

शिव वर्मा : तो काळ एक सत्य होता आणि हा काळ देखील एक सत्य आहे. सत्य हे सत्य असतं त्यात तुलना नाही होऊ शकत. सरदारची केस सुरु होती तेव्हा त्याला जेलमधून सोडवण्यासाठी भगवती भाई बॉम्ब बनवायच्या प्रयत्नात होते त्यातच त्यांचा मृत्यू झाला. कोणाला कल्पना होती, की भगवती चरणला आवडणाऱ्या त्या ओळींमध्ये त्यांच्या जीवनाच्या सखोलतेचं सार सामावलं होतं,

दरे तदबीरपर सर फोडना शेबा रहा अपना ।<br>
वसीले हाथमे आये न किस्मत आजमाई के ॥

त्यांची बायको, आमची दुर्गभाभी आज गाजियाबाद मध्ये राहते. कोणाला माहीत आहे? काकोरी केसमध्ये उरलेला एकमेव माणूस डॉ .मन्मनाथ गुप्त आज निजामुद्दीन दिल्लीमध्ये राहतात. कोणाला माहीत आहे?.. आणि कोणाला माहीत आहे, की कानपूरमध्ये राहणाऱ्या शिव वर्मा नावाच्या माणसाचे हात त्या माणसाच्या हातात होते जेव्हा तो मरायला तयार होत होता.

(अंधार)

**(दृश्य १०)**

खान बहादूर : इथून जाण्याआधी तुझ्या साथीदारांना भेटणार का?

शिव वर्मा : तुझ्या फाशीच्या आधी आम्हाला इथून हलवणार आहेत , दुसऱ्या जेलमध्ये. आपली ही शेवटची भेट सरदार. (थांबतो) एक शेवटचा प्रश्न विचारू, खरं खरं उत्तर दे. मरायला निघालास याची खंत वाटत नाही?

भगत : (हसून) क्रांतीच्या मार्गावर पाऊल ठेवताना मी विचार केला होता , की माझं आयुष्य अर्पण करून जर का मी देशाच्या कानाकोपऱ्यात 'इन्कलाब जिंदाबाद' ही घोषणा पोहोचवू शकलो तर माझ्या आयुष्याचं मोल मला मिळालं. आज या लोखंडी गजांआड बसूनसुद्धा करोडो देशवासीयांच्या कंठातून निघणारा त्या घोषणेचा हुंकार मी ऐकू शकतो. संघर्षाच्या मार्गावर जाणाऱ्यांसाठी माझी ही घोषणा प्रेरणा बनेल याची मला खात्री आहे . तेवीस वर्षे पाच महिने आणि सव्वीस दिवस इतक्या लहानशा आयुष्याचं मोल यापेक्षा अधिक काय असू शकतं?

शिव वर्मा : (रडत) सरदार.

भगत : भावुक होण्याची वेळ अजून आली नाही. मी तर थोड्याच दिवसात या सर्व भानगडीतून सुटका मिळवीन. परंतु, तुम्हा लोकांना दूरचा पल्ला गाठायचा आहे. मला विश्वास आहे, की जबाबदारीचं भलं थोरलं ओझं असूनदेखील या दीर्घ

मोहिमेत तुम्ही थकणार नाही, पराभूत होणार नाही आणि हार मानून वाटेत बसणार नाही.

खान बहादूर : भेटण्याची वेळ संपली.

(स्पॉट)

शिव वर्मा : वेळ संपली.. सगळंच संपलं. नंतर असं कळलं की शेवटची इच्छा म्हणून लेनिनचं चरित्र आणि रसगुल्ले मागवले त्याने . ज्यावेळी आमच्या जेलरनं आम्हाला ही बातमी सांगितली आम्ही खूप रडलो . फाशी नेहमी पहाटे दिली जाते. भगत सिंह, सुखदेव आणि राजगुरू यांच्या फाशीच्या बातमंने लोक अगोदरच खवळलेले होते. ऐनवेळी कोणी दंगा करायला नको म्हणून यांच्या फाशीची वेळ अकरा तास आधी करण्यात आली. बाहेर कुणालाच याचा पत्ता नव्हता. २३ मार्चच्या रात्री या तिघांना फाशी देण्यात आली . यांच्या प्रेतांना जेलच्या मागच्या भिंती तोडून बाहेर काढण्यात आलं. तिकडून मागच्या मागे फिरोजपूरला पाठवण्यात आलं. त्या तिघांच्या प्रेताची लवकर विल्हेवाट लावायची म्हणून प्रेताचे तुकडे करून जाळायचा प्रयत्न केला . पण गावातल्या काही लोकांना हे समजल्यावर त्यांनी तिकडे धाव घेतली . मग गावकऱ्यांच्या भीतीनं ते अर्धवट जळणारे तुकडे तसेच सतलजमध्ये फेकून पोलिस पळून गेले... आजही हुसैनीवाला मध्ये त्यांची समाधी आहे . त्यांच्या अगोदर काही आठवडे आल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांसोबत झालेल्या चकमकीमध्ये पंडितजी गेले. ६५ मध्ये बटुकेश्वरनं इच्छा व्यक्त केली होती , की त्याला देखील ह्या तिघांच्या शेजारी दफन करण्यात यावं. त्याचीही इच्छा पूर्ण करण्यात आली.

(स्पॉट)

किशन सिंह : प्रेमदत.. तीन वर्ष सक्तमजुरी, कुंदन लाल.. सात वर्ष सक्तमजुरी. शिव वर्मा, विजय कुमार सिन्हा, जयदेव कपूर, कमल नाथ, गया प्रसाद, किशोरी लाल, महावीर सिंह, आजन्म काळे पाणी (आवाज पाणवतो) राजगुरू, सुखदेव.. आणि भगत सिंह...
(मुलगी आणि आई रडत आहेत)

भगत : मित्रांनो, जगण्याची इच्छा असणं स्वाभाविक आहे. मी तिला लपवू शकत नाही. पण मला माझ्या अटींवर जिवंत राहायला आवडेल. कैदी अथवा बंदी म्हणून मी जगू इच्छित नाही. हो, पण एक विचार अजूनही माझ्या मनात घर करून राहिला आहे, की देशासाठी आणि मानवतेसाठी जे काही करण्याच्या आकांक्षा माझ्या मनात होत्या, त्याचा एक सहस्त्रांश भागसुद्धा मी पूर्ण करू शकलेलो नाही. याखेरीज फाशीपासून वाचण्यासाठी दुसरा कोणताही विचार माझ्या मनात आलेला नाही. आता मी त्या शेवटच्या क्षणांची आतुरतेने वाट पाहतोय, ते लवकर येवोत हीच इच्छा.

तुमचा मित्र,
भगत.

(गायकचा प्रवेश आणि गाणं)

मेरा रंग दे बसंती चोला...हे माई
ओरे मेरा...रंग दे बसंती चोला..
मेरे चोले में...तेरे माथे का पसीना
और थोड़ी सी..तेरे आंचल की बुँदे है
और थोड़ी सी है..तेरे...कापते बूढ़े हाथों की गर्मी
और थोड़ा सा है तेरी आँखों की...सुर्खी का..शोला
इस शोले को जो...देखा तो आज ये...लाल तेरा..
बोला...अरे बोला..
मेरा रंग दे बसंती चोला...हे माई

[तिघांच्या सावल्या हळू हळू मोठ्या होतात, फासात मान अडकवली जाते]

मेरा रंग दे बसंती चोला मेरा रंग दे मेरा रंग दे बसंती चोला...

[गाणं थांबत, फाशी होते आणि तिघांची मान पडते]

(अंधार)

**(दृश्य १०)**

[ कानपूर, १९९४]

शिव वर्मा : मी आजही जिवंत आहे त्या स्वतंत्र भारतामध्ये ज्याचं स्वप्न त्यांनी पाहिलं होतं . त्याचं स्वप्न.. मनाला शांती मिळाली असेल , चहूकडे उमंग असेल, अत्याचार नसेल, भुकेचं नामोनिशाण नसेल, कसलेही भयप्रद चित्कार नसतील. खरंच आज कुठेच नाहीत कसलेही आवाज. सर्वत्र पसरली आहे एक शांतता .. येणाऱ्या वादळाचा इशारा देणारी. याआधी पाठीवर मारलेल्या फटक्यांचा त्रास व्हायचा कारण ते दिसायचे. आणि आता.. आता ते दिसत देखील नाहीत. कारण आता फटके मारणाऱ्यांना ते दूरवरून मारण्याची सुविधा उपलब्ध आहे. ज्यांना इथून हाकलून लावलं होतं ते आता वेगवेगळ्या प्रकारे परतत आहेत . ईस्ट इंडिया कपंनी व्यापार करायचा म्हणूनच आली होती ... तो म्हणायचा थांबायचं नाही, अनेक अडथळे येतील, पण मला खात्री आहे या दीर्घ मोहिमेत तुम्ही थकणार नाही, पराभूत होणार नाही आणि हार मानून वाटेत बसणार नाही.

मी थकलोय पण थांबलो नाहीय. मी मला शक्य तो प्रयत्न करत आहे. पण कधी कधी त्याचा चेहरा डोळ्यासमोर येतो तेव्हा एक प्रश्न विचारायची खूप मनापासून इच्छा होते , की ‘सरदार... ज्या स्वतंत्र भारताचं स्वप्न आपण पाहिलं, ते असंच होतं का?’

(गायकचा प्रवेश आणि गाणं)

इलाही जिस तसव्वुर को कभी हाँ खून से सींचा था..
इलाही जिस तसव्वुर के लिए गर्दन को भींचा था
इलाही जिस तसव्वुर के लिए हर आग पी ली थी

इलाही जिस तसव्वुर के लिए हर मौत जी ली था..
इलाही क्या कभी सोचा था अपने उस तसव्वुर से ..
जो उपजेगा कभी ऐसा भी ये हिन्दोस्तां होगा..
वतन की आबरू का पास देखें कौन करता है
सुना है आज मक़तल हमारा इम्तिहा होगा...
सुना है आज मक़तल हमारा इम्तिहा होगा...
सुना है आज मक़तल हमारा इम्तिहा होगा..

(अंधार)

इन्कलाब जिंदाबाद

[पडदा]